१०

फक्त कार्यालयीन कामकाजासाठी

महाराष्ट्र शासन

# आदिवासी विकास विभाग

धुळे जिल्ह्यातील आदिवासी मजुरांचा
सीमेलगतच्या राज्यात रोजगारासाठी
होणाऱ्या स्थलांतराचा प्रश्न

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स् गार्डन, पुणे ४११ ००१.

१९९०

फक्त कार्यालयीन कामकाजासाठी

महाराष्ट्र शासन

## आदिवासी विकास विभाग

# धुळे जिल्ह्यातील आदिवासी मजुरांचा सीमेलगतच्या राज्यात रोजगारासाठी होणाऱ्या स्थलांतराचा प्रश्न


## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स् गार्डन, पुणे ४११ ००१.



१९९०

# प्रस्तावना

धुळे जिल्ह्यातील काही आदिवासी क्षेत्रांत भूमीहीन मजुरांची संख्या फार मोठया प्रमाणात आहे. मजुरी हेच त्यांचे उपजिवीकेचे साधन आहे. या मजुरीसाठी त्यांना नेहमी कामाचा इतरत्र शोध घ्यावा लागतो. या भागात कामाची उपलब्धता कमी असल्यामुळे धुळे जिल्ह्यातुन विशेषत: तळोदा, नवापूर, अक्कलकुवा, नंदूरबार व साक्री या तालुक्यामधून मोठया प्रमाणात आदिवासी मजुरांचे गुजराथ राज्यांत रोजंदारीसाठी दरवर्षी स्थलांतर होत असते. या स्थलांतरीत मजुरांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचा अभ्यास करुन उपलब्ध असले त्या स्थितीचा विचार करुन त्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवावी असा या पाहणी मागील उद्देश आहे.

या पाहणीचे काम श्री. यू.एन.चौधरी, संशोधन सहाय्यक यांनी श्री. मो.भा.सुराणा, उपसंचालक यांच्या देखरेखीखाली पूर्ण केले. धुळे जिल्ह्यात काही तालुके निवडून स्थलांतरीत कुटुंबांना भेटी देवून त्याचा अभ्यास केला. या अभ्यासात त्यांनी काही कारखान्यांना, संबंधित अधिकाऱ्यांना भेटी देवून त्यांचेही यासबंधीचे विचार/अभिप्राय समजावून घेतले.

सदर पहाणीत आढळलेले निष्कर्ष स्थलांतरीत होणाऱ्या मजुरांच्या बाबतीत शासनास तसेच या भागात आदिवासी विकासाच्या नियोजनासाठी, अंमलबजावणीसाठी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना उपयुक्त ठरतील असा माझा विश्वास आहे.

आर.एस.नेगी
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.

[illegible]

# प्रकरण १

## धुळे जिल्हयातील रोजगाराबाबत पार्श्वभूमी

### १.१ भौगोलिक रचना :--

महाराष्ट्र राज्याच्या वायव्य दिशेस धुळे जिल्हा वसलेला आहे. त्याच्या उत्तरेस मध्य प्रदेशातील नेमाड जिल्हा, पश्चिमेस गुजराथ राज्यातील सुरत व भडोच जिल्हे, दक्षिणेस नाशिक जिल्हा, तर पूर्वेस जळगांव जिल्हयाच्या सिमा आहेत. या जिल्हयाच्या उत्तरेस सातपुडयाच्या उंच रांगा, दक्षिणेस नाशिक जिल्हयातील सहयाद्रीचा माळमाथा, पूर्वेस जळगांव जिल्हयातील व पश्चिमेस गुजराथ राज्याच्या सुरत व भडोच जिल्हयातील उंचसखल डोंगराळ भागाशी हा जिल्हा संलग्न आहे.

भौगोलिकदृष्टया या जिल्हयाचे उंच सखलपणामुळे हवामान, पर्जन्य व जमीनीच्या प्रतीनुसार तीन भाग पडतात.

(१) जंगले आणि डोंगराळ भागाचा अक्राणी, अक्कलकुवा व तळोदा तालुक्याचा काही भाग.

(२) सधान तापी खो-याचा पट्टा यांत नंदूरबार, शहादा, शिरपूर, शिंदखेडा व तळोदाच्या काही भागाचा समावेश आहे.

(३) तिस-या भागांत धुळे, साक्री व शिंदखेडा तालुक्याचा सखल भागाचा समावेश होतो.

जिल्हयात काही ठिकाणी हलकी जमीन, काही ठिकाणी मध्यम प्रतीची, व काही ठिकाणी काळी कसदार जमीन आढळते. धुळे जिल्हयाचे हवामान उष्ण व कोरडे असून वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७१३ मि.मि. आहे. अनियमित पावसाळा, सतत दुष्काळ सादृश्य परिस्थिती, त्यामुळे जिल्हयाची गणना अवर्षणगत भागामध्ये केलेली आहे.

१.२ लोकसंख्या व क्षेत्र :-

धुळे जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्र १३,१५० चौ.कि.मी. असून महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रापैकी ४.३ टक्के क्षेत्र या जिल्हयाने व्यापलेले आहे. १९८१ च्या गननणेनुसार या जिल्हयाची लोकसंख्या २०,५०,२९४ इतकी आहे. या एकूण लोकसंख्येपैकी ८०.०५ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात रहाते तर १९.९५ टक्के लोकसंख्या ही शहरी भागात वास्तव्य करते. या जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येच्या ४१ टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे, आणि महाराष्ट्रातील जिल्हयामध्ये अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येत या जिल्हयाचा पहिला क्रमांक आहे. म्हणून या जिल्हयाला प्रामुख्याने आदिवासींचा जिल्हा संबोधले जाते. या जिल्हयात प्रामुख्याने भिल्ल, धानका, तडवी, गामीत, मावची, कोकणा व पारधी या जमातीचे वास्तव्य आढळते. या जिल्हयातील एकूण १० (दहा) तालुक्यापैकी तळोदा, अक्राणी, अक्कलकुवा, नवापूर याचार तालुक्यांचा समावेश पूर्णत: व साक्री, शिरपूर, नंदूरबार, शहादा या चार तालुक्यांचा समावेश अंशत: आदिवासी उपयोजना क्षेत्रांत करण्यांत आला आहे. या आदिवासी उपयोजना क्षेत्रात ८७८ गावे असून तळोदा, नंदूरबार व नवापूर शहरांचा यांत समावेश होतो. या जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकी ९,०३,३०० लोक संख्या आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट झालेली आहे. त्यांत ६,१३,९०० एवढया आदिवासी लोकसंख्येचा समावेश आहे.

१.३ सामाजिक व आर्थिक स्थिती :-

या जिल्हयात सर्व साधारण साक्षरतेचे प्रमाणे ३७.४३ टक्के असून पुरुष साक्षरतेचे प्रमाण ४८.४२ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण २५.६८ टक्के आहे. तसेच आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण पाहिले असतां ते १५.२५ टक्के आहे. त्यांत पुरुषांचे साक्षरतेचे प्रमाण २४ टक्के असून स्त्रीयांचे साक्षरतेचे प्रमाण ७ टक्के आहे. धुळे जिल्हयातील साक्री, अक्राणी, अक्कलकुवा, तळोदा, नंदूरबारचा बहुतांश भाग जंगले व डोंगराळ पदेशाने व्याप्त असल्याने येथे दळणवळणाच्या सोयी फारच कमी आहेत. त्यामुळे विकसनशील व

# अनुक्रमणिका


| प्रकरण अ.नं. | विषय | पान क्रमांक पासून | पान क्रमांक पर्यन्त |
|---|---|---|---|
| १. | धुळे जिल्हयातील रोजगारा बाबतची पार्श्वभूमी. | ०१ | ०५ |
| २. | पाहणीची उद्दिष्टये, कार्यक्षेत्र, व्याप्ती व स्वरुप | ०६ | ०८ |
| ३. | स्थलांतराची पार्श्वभूमी व त्याच्या विविध पध्दती. | ०९ | १३ |
| ४. | पाहणीत आढळलेल्या सदृष्य बाबी | १४ | २० |
| ५. | पाहणीसाठी निवडलेल्या गावांचे व कुटुंबाचे आर्थिक व सामाजिक परिस्थीतीचे समालोचन | २१ | ३३ |
| ६. | स्थलांतराची कारणे व दुष्परिणाम | ३४ | ३८ |
| ७. | सुचना व शिफारशी | ३९ | ४१ |
| | × × <u>परिशिष्ट</u> : | | |
| | गावनिहाय स्थलांतरीत मजूरांची संख्या | ४२ | ५८ |

शहरी भागाशी या भागाचा फारसा संबंध येत नाही. त्यामुळे या भागातील आदिवासी इतर भागापेक्षा शैक्षणिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत.

या भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय, काही भागात शेती तर काही भागात शेतमजुरी असा आहे. या भागाची कृषी व औद्योगिक क्षेत्रांत फारशी प्रगती न झाल्यामुळे बारमाही उद्योगधंदा मात्र येथे उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांना कायम स्वरूपी काम मिळण्यासाठी सारखी धडपड करावी लागते. यात प्रामुख्याने अल्प भू-धारकाचा व भूमिहीन आदिवासी मजुरांचा फार मोठा हिस्सा आहे. कामाच्या शोधात आदिवासींबरोबर बिगर आदिवासी मजुरांचाही काही प्रमाणात समावेश होतो. परंतु मुख्यत्वे आदिवासी मजुरांना राज्य बाहेर स्थलांतराची पाळी येते.

१.४ धुळे जिल्ह्यातील कामगारांचे वर्गीकरण :-

१९८१ च्या जनगणनेनुसार धुळे जिल्ह्याच्या २०.५० लाख एकूण लोकसंख्येपैकी ३८ टक्के मुख्यत: काम करणारे, ५.६ टक्के सिमांतिक काम करणारे व ५६.४ टक्के लोकांचा काम न करणा-यांमध्ये समावेश होतो. त्याचे वर्गीकरण खाली दर्शविल्या प्रमाणे.

तक्ता क्र.१.१

कामगारांचे व्यवसायानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | व्यवसायाचे नांव | कामगार संख्या | एकूण कामगार संख्येशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | शेती | १,५६,९०८ | ४१.७६ |
| २. | शेत मजुर | १,९४,३०३ | ५१.७१ |
| ३. | पशुसंवर्धन व वन व्यवसाय, मत्स्यपालन | ४,६९८ | १.२५ |
| ४. | खाण काम | १९६ | ०.०५ |
| ५. | सेवा उद्योग | ५,३०९ | १.४१ |
| ६. | बांधकाम | २,६०७ | ०.६९ |

| अ.क्र. | व्यवसायाचे नांव | कामगार संख्या | एकुण कामगार संख्येशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| ७. | व्यापार व वाणिज्य | ३,३८९ | ०.९० |
| ८. | वाहतुक | १,७८१ | ०.४८ |
| ९. | इतर सेवा | ६,५६८ | १.७५ |
| | एकुण | ३,७५,७८१ | १००.०० |

वरील तक्त्यावरुन असे आढळते की, शेकडा ९४ टक्के कामगार हे शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. या जिल्हयात लागवडीलायक एकूण ७,४७,१०० हेक्टर क्षेत्र आहे. याचे प्रति व्यक्तीशी प्रमाण काढले तर ते ०.३६ हेक्टर येते. शेती मालकापेक्षा शेत मजुरांची संख्या अधिक असल्याचे वरील तक्त्यावरुन दिसून येते.

१.५ रोजंदारी कामाची उपलब्धता :-

धुळे ~~पुणे~~ जिल्हयात शेती हे उपजिवीकेचे प्रमुख साधन असले तरी हलकी जमीन, डोंगराळ व अवर्षण भाग, अल्प भूधारक शेतकरी इत्यादी अनेक कारणांमुळे शेतक-यांना तुटपुंजे उत्पन्न फक्त खरीप हंगामापुरते मिळते. बहुतांशी शेतक-यांना ८ ते ९ महिने जवळजवळ कामच नसते. पावसाच्या पाण्यावर जे पीक येईल त्यावरच त्यांना अवलंबून रहावे लागते. बागायती क्षेत्र नसल्यात जमा आहे. त्यामुळे येथील शेतक-यांना शेतीचे पुरेसे काम नसते. फक्त हंगामाच्या दिवसांत मजुरांकडून शेतक-यांना काम करुन घ्यावे लागते. अशा वेळी आदिवासी मजुरांना काम मिळते. ज्या ठिकाणी जंगल आहे, त्या ठिकाणचे आदिवासी मजुर जंगलात लाकुडतोड करुन मोठया शहरात व मोठया गांवात ती सरपण म्हणून विकतात, व त्यावर थोडया प्रमाणात आपला उदरनिर्वाह करतात. जंगल उत्पादनापासून काही आदिवासी कुटुंबे डिंक, मोहाची फुले, करवंदे इ. पदार्थ गोळा करतात. परंतु हे काम त्यांना फारसे मिळत नाही.

कारखान्याच्याबाबतील आपण जर विचार केला तर धुळे जिल्ह्यातील कारखाने विशेषत: एक कापड मिल व तीन साखर कारखाने हे जिल्हयाच्या मानाने नगण्य असून ते बिगर आदिवासी भागात आहेत. या कारखान्यांत बहुतांशी बिगर आदिवासी मजुरच काम करतांना आढळतात. आदिवासी उपयोजना क्षेत्रांत तसा एकही कारखाना नाही. परंतु साक्री व शहाद्याच्या साखर कारखान्यामुळे व तळोदयाजवळील खांडसरी कारखान्यामुळे काही मजुरांना तात्पुरते काम मिळते.

सरदार सरोवर प्रकल्पासारखे नवे सिंचन पकल्प आता सुरु झाल्यामुळे काही मजुरांना तेथे काम मिळवयास लागले आहे. अशा भागात बरेचसे काम मशीनच्या सहाय्याने असल्याने या ठिकाणी मजुरीच्या कामास फारसा वाव दिसत नाही.

या सर्व बाबींचा विचारकरुन शासनाने या भागात मजुरांसाठी रोजगार हमीची कामे, सामाजिक वनीकरणाची कामे, जवाहर योजनेची कामे सुरु केली आहेत. परंतु मजुरांच्या संख्येचा विचार करता ही कामे अत्यल्प आहेत. त्यामुळे सर्व मजुरांना पुरेसे काम मिळत नाही. त्यासाठी मजुरांना बाहेरच्या राज्यात स्थलांतर करावे लागते. विशेषत: गुजराथ सरहद्दीवरील नवापूर, तळोदा, साक्री, नंदूरबार व अक्कलकुवा या तालुक्यातील बराचसा मजुरांचा लोंढा कामाच्या उपलब्धतेसाठी गुजराथ राज्यांत धाव घेतो. मध्यप्रदेशात मात्र मजुरांना तसा वाव नाही.

[illegible]

[illegible]

[illegible]

# प्रकरण २ रे

## पाहणीची उद्दीष्टे, कार्यक्षेत्र, व्याप्ती व स्वरुप

२.१ महाराष्ट्र शासनाने आदिवासींच्या विकासासाठी धुळे जिल्हयात बहुविध योजना कार्यान्वीत केल्या आहेत. परंतु असे आढळले आहे की, आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर या योजनेचा म्हणावा तितका परिणाम झालेला आढळला नाही. यास बहुविध कारणे आहेत. परंतु ढोबळमानाने असे आढळले आहे की, या भागातील बरेच आदिवासी कुटुंबे जवळजवळ ६ ते ८ महिने आपल्या गावी रहात नाहीत. ते रोजंदारीसाठी नेहमी स्थलांतर करीत असतात. त्यामुळे त्यांचा विकास कार्यक्रमात सहभाग आढळत नाही. या भागातील विकासाला आदिवासींच्या हंगामी स्थलांतराची एक मोठी खीळ असावी असे वाटते. ही खीळ कशी दूर करता येईल या दृष्टिने या संस्थेने अशा कुटुंबांचा स्थलांतराचा अभ्यास हाती घेतला आहे. या अभ्यासात मुख्यत्वे करुन आदिवासींच्या स्थलांतराचे प्रमाण किती आहे ? या स्थलांतराची कारणे कोणती ? हे स्थलांतर कोठून कोठे होते ? त्यामुळे त्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर कसा परिणाम होतो ? अशा विविध बाबींचा अभ्यास करण्याच्यादृष्टीने हा प्रकल्प हाती घेण्यांत आला.

२.२ या अभ्यासाची उद्दीष्टे ढोबळमानाने खालीलप्रमाणे ठरविण्यांत आली.

(१) धुळे जिल्हयातील कोणत्या तालुक्यातुन व गावातुन किती प्रमाणात आदिवासींचे गुजराथ राज्यांत स्थलांतर होते ?

(२) कोणत्या आदिवासी जमातीमध्ये हे स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे ? व ते का ? याचा शोध घेणे.

(३) स्थलांतराची विविध कारणे शोधून काढणे.

(४) आदिवासींना गुजराथ राज्यांत नेताना कोणत्या पध्दतीने नेले जाते, कोणत्या प्रकारची कामे त्यांना दिली जातात, त्यांना त्या भागात कशी वागणूक मिळते याबाबतचा अभ्यास करणे.

(५) या स्थलांतराच्या लोंढयामुळे आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर कसा परिणाम होतो तो अभ्यासणे.

(६) आदिवासींचे स्थलांतर थांबविण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

२.३ <u>अभ्यासासाठी कार्यक्षेत्राची निश्चितता करणे:-</u>

तहसिलदार व गटविकास अधिकारी यांचेबरोबर चर्चा केली असतांना असे आढळते की, धुळे जिल्हयातील साक्री, नवापूर, तळोदे, नंदूरबार व अक्कलकुवा या तालुक्यातुन आदिवासींचे स्थलांतर फार मोठया प्रमाणावर होत असते. त्यामुळे या जिल्हयातील या ५ तालुक्यांची अभ्यासासाठी निवड करण्यांत आली.

२.४ <u>पाहणीची पध्दत :-</u>

(१) वरील अभ्यास खालील पध्दतीने घेण्याचे ठरले.

(१) स्थलांतरीत होणाऱ्या मजुरांची गांवनिहाय माहिती संकलित करणे.

(२) स्थलांतर ज्या गावातून होते त्यामील निवडक गावांना भेटी देणे.

(३) स्थलांतराची पध्दत व कालावधी शोधून काढणे.

(४) स्थलांतरीत होणाऱ्या मजुरांच्या भेटी घेणे व त्यांची यावाबतची माहिती ठराविक नमुन्यांत गोळा करणे आणि तिचे पृथ:करण करणे.

(५) या संबंधित, निगडीत असलेल्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेवून त्यांची या संबंधीची मते अजमावणे.

(६) माहितीच्या पृथ:करणाच्या आधारावर व पाहणीत आढळलेल्या सदृश्य बाबींचा विचार करुन अहवाल तयार करणे.

२.५ <u>व्याप्ती :-</u>

या पाहणीत सर्वच गावांना भेटी देणे तसेच सर्वच मजुरांच्या भेटी घेणे अशक्यप्राय असल्यामुळे ठराविक व उपलब्ध असलेल्या मजुरांकडून ही माहिती मिळविण्यात आली. त्यामुळे या अभ्यासातील निष्कर्ष सर्व साधारण तत्वावरच Generalised Principle आधारलेली आहेत. या पाहणीसाठी म्हणावा तितकासा कालावधी जरी मिळाला नसला तरी मिळालेल्या कालावधीत जास्तीत-जास्त माहिती मिळविण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे. ही माहिती ऑक्टो. ८९ ते डिसेंबर ८९ च्या कालावधीत संकलित केलेली आहे.

२.६ <u>संदर्भ ग्रंथ</u> (Reference Book)

या जिल्ह्याचा याबाबतचा अभ्यास यापूर्वी कोणीही घेतलेला दिसत नाही. त्यामुळे या विषयावरील अभ्यासाबाबतची पुस्तके उपलब्ध नाहीत. अशा प्रकारचा या जिल्ह्यातील हा अभ्यास पहिलाच असावा असे वाटते.

.......

## प्रकरण ३ रे

### मजुरांच्या स्थलांतराची पार्श्वभूमी व त्यांच्या ~~मजुरांच्या~~ विविध पध्दती

गुजराथ राज्याने औद्योगिकदृष्टया चांगली प्रगती केलेली आहे. यंत्र उत्पादनाचे महत्वाचे कारखाने व उद्योगधंदे या भागात सगळ्यात जास्त प्रमाणात आढळतात. या राज्यातील औद्योगिक उत्पादन ब-याच राष्ट्रांची निकड पूर्ण करते, त्यामुळे या भागातील बराच माल भारतातच नव्हे तर भारताच्या बाहेर निर्यात होतो. या भागात विशेषत: कापडाच्या गिरण्या, रेशमी व कृत्रिम रेशमी कापडाच्या गिरण्या, मशिनरीसाठी लागणारे भागाचे (सुटे भाग) कारखाने, रासायनिक द्रव्ये ही मोठया प्रमाणात उत्पादित केली जातात. त्यासाठी मोठमोठे औद्योगिक प्रकल्पही या भागात उभारलेले आढळतात.

या भागाची जमीन सुपीक व काळी कसदार आहे. बागायतीचे साधने मोठया प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे उस, केळी व फळझाडांचे लागवडही मोठया प्रमाणात आढळते. त्यांनी नैसर्गिक भूजलाचा (जमिनीखालील पाणी) जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या भागाचे वर्गीकरण व्यापार पेशीय विभागात करण्यात आले आहे. बहुतांशी लोक हे व्यापारी आहेत व व्यापार करणे हाच त्यांचा जन्मजात व्यवसाय आहे. हे व्यापारी फार धडाडीचे असल्यामुळे त्यांनी औद्योगिक क्षेत्रात प्रवेश करुन संबंध गुजराथमध्ये कारखान्यांचे जाळे पसरविले आहे.

या भागातील भूसंपत्ती म्हणजे खनिज द्रव्ये, उदा: पेट्रोल, केरोसीन हे काही भागात मुबलक आढळतात आणि त्यामुळे पेट्रोलच्या विहिरी व त्यातील पूरक रासायनिक द्रव्य या भागात चांगल्या प्रमाणे उपलब्ध आहेत. त्यामुळे पेट्रो केमिकल्सचे कारखानेही येथे मुबलक आहेत.

मुंबई ही बाजारपेठ त्यांना जवळ पडत असल्यामुळे त्यांच्या जागतिक कीर्तीच्या व्यापारी स्थानांशी संबंध दैनंदिन येत असतो. अशा या प्रगत राज्याला कामगारांची निकड फार भासते आणि ही निकड महाराष्ट्रातील ठाणी, धुळे, नाशिक जिल्ह्यातून पुरविली जाते. गुजराथ राज्यातील कारखान्यामुळे तेथील व्यापारी वर्गाला चांगल्या प्रकारे पैसा मिळत असल्यामुळे, ते मजुरांना त्यांच्या कामाच्या मोबदल्यात तुलनात्मक चांगले दर व हमखास काम देतात व त्यामुळे ठाणी, नाशिक व धुळे जिल्हयातील आदिवासी मजुरांचा लोंढा या भागात जाताना दिसतो.

महाराष्ट्र राज्यातील ठाणे, धुळे आणि नाशिक जिल्हयात बहुतांश आदिवासी भागात खरीपाचेच पीक घेतले जाते. खरीप हंगाम हा जून ते ऑक्टोबर पर्यन्त असतो. त्या कालावधीत शेतमजुरांना शेतीची कामे उदा. पेरणी, निंदणी, कापणी व मळणीची कामे उपलब्ध होऊ शकतात. धुळे जिल्हयातील बरीचशी जमीन बरडी व हलक्या प्रतीची आहे. येथे बागायत क्षेत्र फारसे नसल्यामुळे शेतीची कामे खरीप हंगामावर फारशी नसतात. जवळ जवळ हा कालावधी नोव्हेंबर ते मे पर्यन्तचा असतो. नोव्हेंबर ते मे महिन्या पर्यन्त गुजराथ मध्ये भरपूर प्रमाणात शेतीची कामे मिळत असतात. त्यावेळेस साखर कारखाने सुरु होतात. उसाची तोड भरपूर प्रमाणात होते. भात कापणीची कामे चालू असतात. अशी कामे महाराष्ट्रातील स्थलांतर झालेल्या मजूरांना सहजगत्या मिळतात, त्यामुळे गुजराथमध्ये कारखान्यासाठी लागणाऱ्या कामगारांचा व महाराष्ट्रातील बेरोजगारांचा प्रश्न सोडविला जातो. आणि यासाठी महाराष्ट्रातील मजूर गुजराथमध्ये हंगामी स्थलांतर करतात. महाराष्ट्रातले मजूर हे मेहनती व फार कष्टाळू आहेत. वंश परंपरागत, कष्टाची सवय असल्यामुळे उसाच्या शेतात, भात मळणीमध्ये हे मजूर अग्रक्रमाने रात्रंदिवस काम करीत असतांना आढळतात.

महाराष्ट्रातील आदिवासी मजूर खालील कामाच्या उपलब्धतेमुळे स्थलांतर करीत असतात.

§१§ ऊस तोडणी,

§२§ भात-शेती व मळ्यावरील कामे,

§३§ साखर कारखाने, कापड गिरण्या व इतर कारखाने, आणि

§४§ नवीन बांधकामाची कामे.

गुजराथमध्ये हया मजुरांचे स्थलांतर काही ठराविक पध्दतीने होते. त्या पध्दती खालिल प्रमाणे आहेत.

§१§ ठेकेदार व मुकादमामार्फत रोजंदारी मिळण्याची पध्दत.

हया पध्दतीत उसतोड करणा-या कामगारांचा समावेश आहे. धुळे जिल्हयातील गुजराथ राज्यात नवसारी, मढी, बार्डोली, बलसाड, वलतान, गणदेवी व इतर साखर कारखान्यांवर अदिवासी मजूर साखर कारखान्याच्या कक्षेतील उसाच्या तोडीसाठी जात असतात. असे मजूर किंवा कामगार गावातील माहितीच्या व्यक्तीमार्फत §मुकादमामार्फत§ अगर ओळखीने काम मिळवित असतात. प्रत्येक गावातील असा मुकादम हा त्या गावातील किंवा जवळच्या गावातील आदिवासी मजूरांना काही ठराविक रक्कम आधी देऊन बांधून घेतो. ही रक्कम फक्त ३० ते ५० रुपयांच्या दरम्यान असते. एका मुकादमाच्या हाताखाली जवळ जवळ ५० ते १०० आदिवासी मजूरांचा समावेश असतो. हा मुकादम पावसाळ्याच्या दिवसांत किंवा जुलै ऑगस्टमध्ये देणीपोटी नाममात्र रक्कम देतो. त्यामुळे मजूरांची बांधीलकी कायम होते. मुकादम हा मुख्य ठेकेदाराशी संबंधीत असतो. मुख्य ठेकेदाराकडे १० ते १२ गावातील मजूरांचा किंवा १००० ते १,२०० मजूरांचा समावेश असतो. मुख्य ठेकेदार हा कारखान्यातील

व्यवस्थापकीय संचालकांशी बांधलेला असतो. व्यवस्थापकीय संचालक ठेकेदारांना मजुर पुरविण्यासाठी, व मजुरांना वाटण्यासाठी काही रक्कम काही अटींवर देतो. ही रक्कम ठेकेदार मुकादमाला देतो व मुकादम संमती दिलेल्या मजुरांना ती रक्कम वाटतो. प्रत्येक ठेकेदाराला प्रत्येक मजुरामागे प्रतिदिनी १ ते २ रुपये कामगारांच्या वेतनातुन काढून दिले जातात. मुकादमाला या मजुरांच्या कामावर देखरेख ठेवावी लागते. व या देखरेखीच्यापोटी ठेकेदार मुकादमाला कामाच्या प्रमाणात मोबदला देत असतो. ठेकेदार ही रक्कम मजुराच्या शेवटच्या दिलेल्या रकमेतुन वसुल करुन घेतो.

आदिवासी मजूरांना मजूरी देण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे.

मजूर ज्या वेळी कामाला लागतो त्या वेळी त्याला राहण्यासाठी बांबं व बांबुचे सप कारखान्याकडून पुरविले जातात. ज्या ठिकाणी उस तोडीचे काम असते त्याच्या जवळपास किंवा मध्यवर्ती ठिकाणी असे मजुर बांबु व सपाची झोपडी तयार करतात. व अशा झोपडीत कामाच्या कालावधीत ते राहतात.

खाण्या-पिण्याच्यादृष्टीने प्रत्येक जोडीमागे ३० किलो धान्य व रु.३० दर पंधरवडयाला कारखान्याकडून मजुरीपोटी दिले जातात. व बाकी मजुरी कारखानदार आपल्याकडे राखून ठेवतात. यामुळे मजुरांची उपजिवीकाही होते आणि मजुर हे कारखान्याशी पूर्णपणे बांधले जातात. त्यामुळे कारखान्याचे काम पूर्ण होईपर्यन्त मजुरांना दुसरीकडे हलता येत नाही. कारखान्याचे काम बंद झाल्यानंतर मजुर कामगार गटाच्या कामाची एकूण रोजंदारी उस तोडीच्या वजनाप्रमाणे दिली जाते. या रकमेतुन पूर्वी दिलेल्या अन्नधान्य, बांबु, सप व मजुरीची रक्कम त्यांना आणण्याचा खर्च कापून राहीलेली रक्कम ठेकेदारामार्फत दिली जाते. तदनंतर ठेकेदार आपले कमिशनची रक्कम वजा करुन राहीलेली रक्कम मुकादमामार्फत मजुरांना वाटतो. ही राहीलेली रक्कम एकत्र मिळत असल्यामुळे फार मोठया प्रमाणात मजुरी मिळालेली आहे असे मजुरांना भासते. परंतु ही एकत्र रक्कम त्यांची ६ ते ८ महिन्यांची बचत

असते. या बचतीची रक्कम आदिवासी मजुरांना त्यांच्या अर्धवट उपासमारीच्या दिवसांत विशेषत: पावसाळ्यांत फार उपयोगी पडते.

## २ बांधकामासाठी रोजंदारीची ठेकेदार पध्दत :-

नवीन बांधकामासाठी महाराष्ट्रातील काही मजुर गुजराथमध्ये स्थलांतर करतात. या मजुरांना नेताना ठेकेदार ठराविक दराने रोजची मजुरी ठरवून नेत असतात. या मजुरांना दर हप्त्याला ठरलेल्या मजुरीप्रमाणे पैसे दिले जातात. यात मात्र त्या शहरात असलेल्या मजुरीच्या दराचा किंवा महागाईचा विचार केला जात नाही. हे मजुर बहुतांशी सुरत व भडोच शहरात व आसपास नवीन बांधकामाची कामे करतात.

## ३ उक्ते किंवा उघड पध्दतीने काम ठरविण्याची पध्दत :-

या पध्दतीत भात शेती व इतर शेती कामावर जाणाऱ्या मजुरांचा समावेश आहे. हे मजुर शेतीकामाचे स्वरुप पाहून त्या कामाच्या मोबदल्याबद्दल एकदम रक्कम ठरवितात व त्या ठरलेल्या रकमेत ते काम केले जाते. हे काम मजुरांच्या गटामार्फत केले जाते. एका गटात १२ ते १५ मजुर असतात. या कामाचे स्वरुप अगदीच तात्पुरते असून हंगामी अगर कायम स्वरुपी काम मिळेलच अशी खात्री नसते. त्यांना कोणत्याही प्रकारे आगाऊ रक्कम दिली जात नाही किंवा काही सवलतीही दिल्या जात नाहीत. काम पूर्ण केल्यानंतर शेतकऱ्याकडून एकदम सर्व रक्कम मिळते. अशा प्रकारचे मजुर नवापूर तालुक्यातुन जवळच्या भडोच जिल्ह्यात स्थलांतर करतात. अशा प्रकारचे काम मजुरांना सतत मिळते. याला किमान वेतन कायद्याखाली मजुर दराचे किंवा सेवेच कोठेही संरक्षण नाही. हे मजुर ठेकेदार किंवा शेतकऱ्यांशी बांधलेले नसतात. हे काम अंगावर असल्यामुळे त्याबाबत चांगला मोबदला मिळतो. व मजुरीचे दरही चांगले पडतात.

## प्रकरण ४ थे

## पाहणीत आढळलेल्या सदृश्य बाबी

या पाहणीत आढळलेल्या सदृश्य बाबींची माहिती खालील चार विभागांत विभागण्यांत आली आहे.

(१) महाराष्ट्र राज्यातून गुजराथ राज्यांत स्थलांतर करणा-या तालुकानिहाय कुटुंबाच्या व्यक्तींची संख्या.

(२) स्थलांतर करणा-या आदिवासींमध्ये कोणत्या जमातीचा प्रामुख्याने समावेश आहे ते पाहणे.

(३) स्थलांतर करणा-या जमातीच्या सामाजिक परिस्थितीचा आढावा घेणे.

(४) स्थलांतर करणा-या आदिवासी कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे.

महाराष्ट्र राज्यातून गुजराथमध्ये किती कुटुंबांचे स्थलांतर होते या-बाबतची माहिती तहसिल कार्यालयाकडून प्राप्त करण्यांत आली. तहसिल कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीचे संकलन खालीलप्रमाणे देण्यांत येत आहे.

तक्ता क्र. ४.१

गुजराथ राज्यांत स्थलांतर होणा-या आदिवासी कुटुंबाची तालुका-निहाय गावाची आकडेवारी :-

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | एकूण गांवे | आदिवासी मजुराचे स्थलांतर होणा-या गावाची संख्या | तालुक्यातील एकूण गावाशी स्थलांतरीत होणा-या गावाचे शेकडा प्रमाण. | सर्वात जास्त स्थलांतर होणा-या गावाची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | तळोदा | ९२ | ५४ | ५९.७८ | बोरद, कळमसे आमलपाडा, प्रतापपूर. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २. | नंदूरबार | १५२ | १३५ | ८८.८२ | नागसर, भांगरे, सिंदगव्हाण, घमडाई, आटाटे. |
| ३. | साक्री | १८२ | १०५ | ५७.६९ | जैताने, वार्सा, दहिवेल, धमेर, पौपाळ |
| ४. | नवापूर | १३३ | ९६ | ७२.१८ | खोकडा, बावडी, मोगरानी, सोनारे, किणगांव, खोडकी |
| ५. | अक्कलकुवा | १८७ | ३५ | २०.८६ | अंबाबारी, मोलीपाडा, सिंगपूर, मोरंबा, दसरापाडा. |
| | | ७४६ | ४२५ | ५७.६४ | |

वरील तक्तयावरुन असे निदर्शनास येते की, धुळे जिल्हयातील १०(दहा) तालुक्यापैकी विशेषत: साक्री, नंदूरबार, तळोदा, नवापूर, अक्कलकुवा या पाच तालुक्यातुन आदिवासी कुटुंबे हंगामी स्वरुपात रोजंदारीसाठी गुजराथ राज्यांत स्थलांतर करीत असतांत. हे सर्व तालुके गुजराथ राज्याशी संलग्न आहेत. या पाच तालुक्यातील ७४६ गावापैकी प्रामुख्याने ४२५ गावांमधून आदिवासी कुटुंबाचे स्थलांतर होते. हे स्थलांतर या तालुक्यातील एकूण गावांच्या ५८ टक्के गावांमधून होते. सर्वात जास्त स्थलांतर नंदूरबार तालुक्यातील गावांमधून होत असतांना आढळले आहे. या गावांच्या स्थलांतराचे प्रमाण ८८.८२ टक्के आहे. तर सर्वात कमी स्थलांतराचे प्रमाण अक्कलकुवा तालुक्यांत दिसेते. स्थलांतराचे हे प्रमाण तसे फार मोठया प्रमाणावर आहे. हे स्थलांतर गावांच्या पाडयांमधून विशेषत: ठराविक जमातींच्या पाडयांमधून होत असलेले आढळले. ब-याच ठिकाणी पाडयाचे पाड उजाड झालेले आढळतात. इतर तालुक्यातील काही गावांतुनही आदिवासी कुटुंबाचे काही प्रमाणांत स्थलांतर होते.

परंतु त्याची फारशी नोंद अद्याप झालेली दिसत नाही.

गांवनिहाय व तालुकानिहाय स्थलांतरीत होणाऱ्या मजुरांची आकडेवारी परिशिष्ट क्र. १ मध्ये देण्यात आली आहे.

स्थलांतरीत होणाऱ्या आदिवासी जमाती :-

गुजराथ राज्यांत आदिवासींच्या कोणत्या जमाती स्थलांतरीत होतात या संबंधीची माहिती प्रश्नावलीत संकलित केलेली आहे. त्या संबंधीची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

तक्ता क्र. ४.२

गुजराथ राज्यांत तालुकानिहाय स्थलांतरीत होणाऱ्या आदिवासी जमाती

| अ.नं. | तालुक्याचे नांव | तालुक्यातील प्रमुख आदिवासी जमाती | स्थलांतरीत होणाऱ्या आदिवासी जमाती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | तळोदा | भिल्ल, धानका, गामीत | भिल्ल, वळवी, पावरा, वसावे, पाडवी, |
| २. | नंदूरबार | भिल्ल, धानका, गामीत, कोकणा | भिल्ल, कोकणा |
| ३. | साक्री | भिल्ल, गामीत, कोकणा फासेपारधी | भिल्ल, कोकणा, फासेपारधी. |
| ४. | नवापूर | भिल्ल, धानका, गामीत, कोकणा, नायकडा मावची. | भिल्ल मावची |
| ५. | अक्कलकुवा | भिल्ल, गामीत, कोकणा | भिल्ल ॅपाडवी, तडवी, वळवी.ॅ |

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, धुळे जिल्ह्यात भिल्ल, कोकण, गामीत व धानका या आदिवासी जमाती प्रामुख्याने वरील पाच तालुक्यांत आढळतात. या जमातीपैकी भिल्ल या जमातीमध्ये स्थलांतराचे प्रमाण जास्त आढळते. धानका व गामीत या आदिवासी जमातींमध्ये स्थलांतराचे प्रमाण फारसे आढळत नाही. खरे पाहिले असता, भिल्ल, गामीत व धानका या एकाच आर्थिक पातळीच्या जमाती आहेत. परंतु धानका व गामीत या जमातींना मजुरीसाठी स्थलांतर करणे फारसे आवडत नाही. काही ठिकाणी कोकण व फारसे पारधी या आदिवासी जमातीतील कुटुंबांचे स्थलांतर झालेले आढळलेले आहे. या अहवालासोबत ज्या गावांतुन आदिवासी कुटुंबाचे स्थलांतर होते त्या गावांची नांवे, गांवनिहाय आदिवासी लोकसंख्या व स्थलांतर होणाऱ्या गांवनिहाय आदिवासींची संख्या परिशिष्ट क्र. १ मध्ये दिली आहे. त्या तक्त्यावरून असे आढळते की, काही गावांमधून सर्वच्या-सर्व आदिवासी मजुर स्थलांतर करतात. काही गावांतुन ५० ते ७० टक्के आदिवासींचे स्थलांतर झालेले आढळलेले आहे व राहीलेल्या गावांत स्थलांतराचे प्रमाण ५० टक्क्या-पेक्षा कमी आहे. सर्वात जास्त स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबाची संख्या वीरद, कढमसरे, आमलपाडा, आंबाबारी, मोरंबा, मोगराणी, वारडी, सोनारे, निजामपूर, जैताने, धानेर, नागसर व ठाणेपाडा या गावांत आढळते. एकूण स्थलांतरीत होत असलेल्या गावांतील लोकसंख्येपैकी १२.८३ टक्के लोकसंख्या स्थलांतरीत होत असलेली आढळली. या स्थलांतरीत होणाऱ्या आदिवासी जमातीचे त्या भागातील एकूण आदिवासी लोकसंख्येशी ७.२८ टक्के प्रमाण आढळते.

या भागातुन स्थलांतरीत झालेली आदिवासी कुटुंबे गुजरात राज्यांत बहुधा उस तोडणीसाठी तसेच शेती कामासाठी जास्त प्रमाणांत जात असतात. उस तोडणीचा हंगाम ऑक्टोबर ते मे महिन्यांत असतो. त्यामुळे हे मजुर गुजरात राज्यांत हंगामी ६ ते ८ महिने वास्तव्य करीत असतात. त्यांची यावेळी वस्ती ही फिरती

वस्ती असते. ज्या क्षेत्रांत जसजसे काम उपलब्ध होईल तसतसे त्यांचे स्थलांतराचे क्षेत्र बदलत असते. थोडक्यांत या आदिवासींचे सहा महिने जीवन भटक्या स्वरुपाचेच असते, असे निदर्शनास येते. या अवस्थेत ते आपली लाहानशी झोपडी मध्यवर्ती ठिकाणी उभारुन थोडासा निवारा मिळविल असतांत. या स्थलांतराच्या कालावधीत बहुतेक त्यांना उघडयावरच रहावे लागते. काही आदिवासी आपले स्वत:चे घर तात्पुरत्या स्वरुपात तयार करतात. शेत मजुरांच्याबाबतीत म्हणावयाचे असल्यास त्यांना उघडयावरच पडावे लागते. त्यांच्या सपाच्या झोपडयाही आढळत नाहीत. त्यांच्या-बरोबरच त्यांची लहान लहान मुलेही या प्रकारचे जीवन कंठीत असतांत. अशा हंगामी स्थलांतरामध्ये मुलांच्या शाळेकडे, अभ्यासाकडे व आरोग्याकडे पूर्णत: दुर्लक्ष झालेले आढळते व त्यांचे अनिष्ट परिणाम ब-याचवेळी दृष्टिस पडतांत. उलटअर्थी ज्या भागातुन हे आदिवासी मजुर आलेले असतांत त्या भागातील शाळेत मुलांच्या गळतीचे प्रमाण फार मोठे आढळते. अशा जमातीसाठी शिक्षणाच्या सोयी, आरोग्याच्या सोयी, इत्यादी फार मोठया प्रमाणावर शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या असल्या तरी पोटासाठी भटकणा-या या जमातींना काडीमात्र उपयोग होत नाही. उलट त्यांची भावी पिढीमध्ये निरक्षरतेचे प्रमाण वाढलेले आढळेल. सतत कामामुळे त्यांच्यात निस्तेजता आलेली दिसते.

या त्यांच्या हंगामी फिरत्या जीवनामुळे त्यांना आरोग्याच्या सोयी फारशा उपलब्ध होत नाही. पिण्यासाठी काही ठिकाणी स्वच्छ पाणीही मिळत नाही. पाण्याच्या कमतरतेमुळे आंघोळही ते करीत नाहीत. त्यामुळे त्वचेचे अनेक रोग त्यांच्यामध्ये झालेले आढळतात. ब-याचवेळी आजारपणांत वेळेवर औषधोपचार न केल्यामुळे काही मजुर दगावल्याचीही उदाहरणे आहेत.

आदिवासी मजुर हे अंगमेहनतीची रात्र-दिवस कामे करीत असल्यामुळे थकवा दूर करण्यासाठी ते दारु पीत असतांत. परंतु असे आढळले आहे की, दारुमुळे त्यांच्या शरीरावर अनीष्ट परिणाम होतो. बराचसा त्यांचा पैसा त्यांना या व्यसनापायी मगवावा लागतो.

या पाहणीसाठी एकूण पाच तालुक्यातील १३ गावांना भेटी देण्यांत आल्या व प्रत्येक गावांतुन ५ ते १० कुटुंबाची वैयक्तिक माहिती संकलित करण्यांत आली. या पाहणीत खालीलप्रमाणे कुटुंबियांची पाहणीसाठी निवड करण्यांत आली. त्यांत आढळलेल्या बाबींचे विवेचन पुढील परिच्छेदात करण्यांत आलेले आहे.

तक्ता क्र. ४.३

पाहणीसाठी निवडलेली : गावे व कुटुंबे

| अ.नं. | तालुका | निवडलेल्या गावांचे नांव | पाहणीसाठी निवडलेली आदिवासी कुटुंबे |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | तळोदा | बोरद | ११ |
| | | प्रतापपूर | ५ |
| २. | नंदूरबार | घमडाई | ४ |
| | | शिंदगव्हाण | १ |
| ३. | | नागसर | ७ |
| ३. | साक्री | वार्सा | ८ |
| | | मळगांव | १० |
| | | कासारे | २ |
| | | दहिवेल | १ |
| ४. | नवापूर | खोकडा | ६ |
| | | झामणझर | ८ |
| ५. | अक्कलकुवा | अंबाबारी | ८ |
| | | रायसिंगपूर | ५ |

या पहाणीत प्रत्येक तालुक्यातुन कमीत कमी २ गावांची निवड करण्यांत आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक तालुक्यातील स्थलांतराबाबतच्या स्थितीचे प्रतिबिंब या

पाहणीत आढळलेले आहे. या पाहणीत ग्रामसेवक व तलाठी मार्फत निवडलेल्या प्रत्येक गावाची मूलभूत माहिती संकलित करण्यात आलेली आहे. तसेच गावात राबविण्यात येणाऱ्या रोजगार हमी योजना, जवाहर योजना व इतर विकासाच्या हाती घेतलेल्या कामाबद्दल माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे. या माहितीमुळे तसेच विकास योजनामुळे आदिवासी मजुरांना किती प्रमाणात कामाची उपलब्धता झालेली आहे हे दृष्टीप्त्तीस येते. बऱ्याचशा मजुरांच्या प्रश्नाचा उकल या अहवालात करण्यात आलेला आहे.

या पाहणीमध्ये फक्त आदिवासी मजुरांचाच विचार न घेता ते ज्या ठिकाणी काम करतात त्या ठिकाणच्या मालकाचे, व्यवस्थापकाचे, मजुरांसंबंधीचे विचार विचारात घेतलेले आहेत. त्यांवर आधारीत काही निष्कर्षही काढण्यात आलेले आहेत. ते पण या अहवालात नमूद करण्यात आलेले आहेत.

.. ..

[illegible]

[illegible]

[illegible]

## प्रकरण ५ वे.

### पाहणीसाठी निवडलेल्या गावांतील कुटुंबांचे आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे समालोचन.

धुळे जिल्ह्यातील निवडलेल्या ५ तालुक्यातून खालील प्रमाणे पाहणीसाठी गांवे निवडण्यात आली.

तक्ता क्र. ५.१

/ पहाणी साठी निवडलेली गांवे /

| अं.न. | तालुका | पाहणीसाठी निवडलेली गावे | | जनगणना क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ |
| १. | नंदूरबार | १. | शिंदगव्हाण | ६४८ |
| | | २. | धामडाई | २३ |
| २. | साक्री | ३. | वार्सस | २६ |
| | | ४. | मालपूर | ११९ |
| | | ५. | दहिवेल | ३१ |
| ३. | नावापूर | ६. | खोकडा | ४ |
| | | ७. | झामझर | ५ |
| | | ८. | धनराट | १०४ |
| | | ९. | बेडकी | ११७ |
| ४. | तळोदा | १०. | प्रतापपूर | ४६ |
| | | ११. | बोरद | ६६ |
| ५. | अक्कलकुवा | १२. | अंबाबारी | १०२ |
| | | १३. | रायसिंगपूर | १२५ |

वरील १३ गावांची निवड करीत असताना ज्या गावांतून आदिवासी मजूरांचे स्थलांतर जास्त प्रमाणात होते अशी गांवे पाहणीसाठी निवडण्यात आली होती. यात विशेषत: बागायतीची गावे तसेच निव्वळ कोरडवाहू उत्पन्न काढणा-या गावांचा समावेश आहे.

५.१ लोकवस्ती :

या निवडलेल्या १३ गावांची एकूण लोकसंख्या २९,३९० असून त्यापैकी आदिवासींची लोकसंख्या १६,३२३ आहे. यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ५६ टक्के असून ही बहुतांशी गावे आदिवासी उपयोजनेत येणारी गावे आहेत. ५०० लोकसंख्येच्या लहान वस्तीच्या गावापासुन ते ५००० लोकसंख्या असलेल्या बोरद सारख्या मोठया गावाचासुध्दा या पाहणीत समावेश आहे. यात प्रामुख्याने भिल्ल गावीत, कोकणा या प्रमुख आदिवासी जमातींचा समावेश आहे. भिल्लजमातीचे प्रमाण या गावांतून जास्त आढळते.

५.२ व्यवसायानुसार कामक-यांची वर्गवारी.

या निवडलेल्या गावात व्यवसायानुसार कामक-यांचे वर्गीकरण खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. ५.२

व्यवसायानुरुप कामक-यांचे वर्गीकरण

| अ.नं. | व्यवसाय | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | शेतकरी | ५६७६ | ३१.५५ |
| २. | शेतमजुर | १२१२२ | ६७.३९ |
| ३. | व्यापारी | १५४ | ०.८६ |
| ४. | इतर व्यवसाय | ३७ | ०.२० |
| | एकुण | १७९८९ | १००.०० |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की बहुसंख्य कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेतमजुरी असा आहे.

एकूण कुटुंबापैकी ३१.५५ टक्के शेतकरी आहेत ६७.३९ टक्के शेतमजुर आहेत. व बाकीचे इतर व्यवसायात १ टक्का लोक गुंतलेले आढळतात. शेतमजुरीच्या कुटुंबाचे प्रमाण ६७.३९ टक्के येते. शेतकरी व शेतमजूरी याचे एकत्रीकरण केले तर असे आढळते की शेतीवर उपजिविका करणारे जवळ जवळ ९९ टक्के कुटुंबे आहेत. शेतक-यांचे प्रमाण हे ३१ टक्के असले तरी त्यात बहुसंख्य कुटुंबे ही अल्पभूधारक आहेत. आदिवासी कुटुंबाकडे जमीनीचे प्रमाण नगण्यच आहे व ते आपली उपजिवीका शेतीची मजूरी करूनच करतात.

५.३ शेती

निवडलेल्या गावातील एकूण लागवडीखालील क्षेत्र ११५६२.४७ हेक्टर आहे त्यापैकी बागायतीचे क्षेत्र १३६८.८३ हेक्टर असे आहे. बागायतीचे एकूण लागवडीलायक क्षेत्राशी प्रमाण काढले तर ते ११.८४ टक्के येते.

५.४ पिके

या भागातील महत्वाची पिके म्हणजे ज्वारी, नागली, भात, सावा, बंटी, उडीद, बाजरी, मक्का, व तूर असे आढळते. बागायती पिकात गहू, हरबरा, व काही ठिकाणी उसाचे पिक घेतलेले आढळते.

या भागाची जमीन काही ठिकाणी काळी कसदार तर बहुतांश ठिकाणी हलक्या प्रतीची मुरमाड जमीन आढळते. चांगल्या प्रतीची जमीन ही बिगर आदिवासी शेतक-यांकडे असून त्यांची देखभाल मजूराकडून केली जाते. या भागाची जमीन चढ उताराची असल्यामुळे जलसिंचनास फारसा वाव नाही तसेच येथील हवामान उष्ण व कोरडे असल्यामुळे दुसोटा किंवा तिसोटा पिक घेतले जात नाही. बहुतांशी नैसर्गिक पावसावर खरीपाचे फक्त पीक घेण्याची ह्या भागात पध्दत आहे.

५.५. औद्योगिक क्षेत्र

निवडलेल्या गावात कोठेही औद्योगिक क्षेत्र असे आढळले नाही.

परंतु साक्री व शहादा येथे साखर कारखाने आहेत. तळोदा तालुक्यात निंभोरा व शहादयाच्या जवळ खांडसरीचे २ कारखाने आहेत. या कारखान्यात बहुतांशी बिगर आदिवासींचाच भरणा जास्त आढळतो. औद्योगिकरणामध्ये फक्त अकुशल कामगार म्हणून काही आदिवासी मजूर काम करीत असतात. या भागात औद्योगिक वसाहती फारशा नसल्यामुळे कारखान्याच्या मजूरीची कामे देखिल आदिवासींना फारशा मिळत नाहीत.

शासनाने या मजूरांना भरपूर प्रमाणात काम देण्यासाठी, रोजगार हमी योजना, जवाहर योजना लागू केल्या आहेत. परंतु पाहणीत असे आढळले की ३ गावे सोडून बाकीच्या १० गावांत जवाहर योजनेची कामे घेतलेली नाहीत. रोजगार हमीची कामे २ गावांत चालू आहेत, बाकी ११ गावांत रोजगार हमीची कामे नाहीत ही कामे पण अगदी अल्प प्रमाणात सुरु आहेत व ती सुध्दा काही ठराविक मजूरांनाच मिळतात. सर्वांना ही कामे उपलब्ध होत नाहीत. आदिवासी मजूरांना त्यांच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी त्यांना दैनंदिन मजूरीची पगार जरुरी असते, तशी दैनंदिन मजूरी रोजगार हमी योजना किंवा जवाहर योजनेत मिळत नाहीत.

या भागात बांधबंदिस्तीच्या कामास, जमीन सपाटीकरण करण्यास, सामाजिक वनीकरण, पाटबंधारे प्रकल्प, पांझर तलाव इत्यादी अनेक विकासाची कामे सुरु करण्यास वाव आहे. परंतू ती त्या प्रमाणात सुरु झालेली आढळत नाहीत, त्यामुळे आदिवासी मजूर हे नेहमी कामाच्या शोधात असतात.

थोडक्यात असे म्हणता येईल की मजूरांच्या प्रमाणात या भागात कामे उपलब्ध होत नाहीत, थोडीफार जी कामे आहेत त्यात आदिवासी मजूर फारशी रुची दाखवित नाहीत. परिणामी, या भागात कायमस्वरुपी काम नसल्यामुळे व जवळच्या राज्यात भरपूर प्रमाणात कामांची उपलब्धता होत असल्यामुळे हे सर्व मजुर गुजराथ राज्यात स्थलांतर करतात.

ती बहुधा बार्डोली, मढी, चलनान, सुरत, व्यारा, उकना, गणदेवी, नवसारी, राजकोट या भागात कामासाठी जातात.

५.६ या पाहणीसाठी निवडलेल्या गावामधून खालील प्रमाणे आदिवासी कुटुंबाची निवड करण्यात आली आहे.

तक्ता क्र. ५.३

निवडलेल्या कुटुंबाची संख्या

| अ.नं. | तालुका | गावाचे नांव | निवडलेल्या कुटुंबाची संख्या |
|---|---|---|---|
| १. | तळोदा | प्रतापपूर | ५ |
| | | बोरद | ११ |
| २. | नंदूरबार | खमडाई | ४ |
| | | शिंदगव्हाण | ९ |
| | | नागसर | ७ |
| ३. | साक्री | मकांव | १० |
| | | वर्सिस | ८ |
| | | दहिवेल | १ |
| | | कासारे | २ |
| ४. | नवापूर | खामनहार | ८ |
| | | खोकडा | ६ |
| ५. | अक्कलकुवा | रामपसिंगपूर | ५ |
| | | आंबाबारी | ८ |
| | एकुण ५ तालुके | १३ गांवे | ८४ |

५.७ एकुण या पाहणीत ८४ कुटुंबे ५ तालुक्यातून निवडण्यात आली. त्या कुटुंबाची जमाती निहाय वर्गवारी खालील प्रमाणे आहे :-

तक्ता क्र. ५.४

जमातीनिहाय आदिवासी कुटुंबांची संख्या

| अ.नं. | तालुका | तालुका निहाय व जमाती निहाय आदिवासी कुटुंबे संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भिल्ल | मावची | वसावे | गावीत | तडवी | एकुण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | तळोदा | १६ | – | – | – | – | १६ |
| २. | नंदूरबार | १९ | – | – | १ | – | २० |
| ३. | साक्री | २१ | – | – | – | – | २१ |
| ४. | नवापूर | १ | १३ | – | – | – | १४ |
| ५. | अक्कलकुवा | – | – | ३ | २ | ८ | १३ |
| | एकुण | ५७ | १३ | ३ | ३ | ८ | ८४ |

यात प्रामुख्याने ५७ भिल्ल जमातीचा १३ मावची व ८ तडवी या आदिवासी जमाती कुटुंबाचा समावेश आहे. स्थलांतरीत होणा-या आदिवासींमध्ये भिल्ल व मावची या जमाती प्रामुख्याने आढळतात.

५.८ स्थलांतराचा कालावधी

स्थलांतरीत कुटुंबे बहुधा ऑक्टोबर ते मे या महिन्यातील कालावधीत गुजराथ राज्यात काम करतात. जे ते सप्टेंबर या कालावधीत आदिवासींना महाराष्ट्रात शेतीच्या कामाची मजूरी थोडया फार प्रमाणात उपलब्ध होते. ही कुटुंबे स्थलांतरीत होतांना आपल्या कुटुंबातील सर्व लहान व वयोवृध्द व्यक्तींना सोबत नेतात. प्रसंगी ~~पत्नीतील~~ एखादी वयोवृध्द व्यक्ती घराची देखभाल करण्यासाठी ठेवतात. पाहणीतील स्थलांतर होणा-या आदिवासी कुटुंबाचे तालुकानिहाय सरासरी संख्या खालील प्रमाणे आढळते.

तक्ता क्र. ५. ५

स्थलांतरीत कुटुंबाची तालुकानिहाय आकडेवारी.

| अ.नं. | तालुक्याचे नांव | कुटुंबाची संख्या | कुटुंबातील व्यक्ती | स्थलांतरीत होणारी कुटुंबातील व्यक्तींची सरासरी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | तळोदा | १६ | ६७ | ४.०० |
| २. | नंदूरबार | २० | ११२ | ६.०० |
| ३. | साक्री | २१ | १०१ | ५.०० |
| ४. | नवापूर | १४ | ७९ | ६.०० |
| ५. | अक्कलकुवा | १३ | ६५ | ५.०० |
| | | ८४ | ४२४ | ५.०० |

वरील तक्त्यावरुन असे दिसले की एका कुटुंबातून सरासरी ५ व्यक्ती स्थलांतरीत झालेल्या आढळतात.

५.९ साक्षरता

तक्ता क्र. ५.६

स्थलांतरीत व्यक्तींचे साक्षरतेचे प्रमाण

| अ.नं. | तालुका | एकूण व्यक्ती | साक्षर व्यक्ती | साक्षरतेचे शे.प्र. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | तळोदा | ६७ | ४ | ५.९७ |
| २. | नंदूरबार | ११२ | ४ | ३.५७ |
| ३. | साक्री | १०१ | ३ | २.९७ |
| ४. | नवापूर | ७९ | २ | २.५३ |
| ५. | अक्कलकुवा | ६५ | ५ | ७.६९ |
| | | ४२४ | १८ | ४.२५ |

या वरील तक्त्यातील आकडेवारीवरून असे दिसते की स्थलांतर होणारे आदिवासी रोजगार अशिक्षितच आहेत, त्यांचे मधील साक्षरतेचे प्र      जवळपास ४ ते ५ टक्केच आहे, अर्थात हे प्रमाण जवळ जवळ नगण्य समजण्यास हरकत नाही. वि विशेषत: त्यातल्या त्यात स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण तर १ टक्क्यापेक्षाही कमी आहे. त्यामुळे स्थलांतरीत होणारा हा समुह निरक्षर आहे हे स्पष्ट आहे.

५.१० जमीन धारणा

पाहणीसाठी निवडण्यात आलेल्या कुटुंबाकडे असलेल्या जमिनीची आकडेवारी खालीलप्रमाणे दिली आहे.

तक्ता क्र. ५.७

निवडलेल्या कुटुंबाकडे असलेल्या जमिनीची आकडेवारी

| अ.नं. | तालुका | पाहणीसाठी निवडलेली कुटुंबे | जमिन क्षेत्र एकर गुंठे | जमिन धारणेचे सरासरी प्रमाण एकर गुंठे. |
|---|---|---|---|---|
| १. | तळोदा | १६ | ४.०० | ०.१० |
| २. | नंदूरबार | २० | २१.०० | १.१८ |
| ३. | साक्री | २१ | २१.०० | १.०० |
| ४. | नवापूर | १४ | ४.०० | ०.१२ |
| ५. | अक्कलकुवा | १३ | ३७.०० | २.३४ |
| | एकूण | ८४ | ९५.०० | १.०५ |

वरील आकडेवारीवरून असे दिसले की, स्थलांतरीत आदिवासी कुटूंबाकडे प्रत्येकी जमिनधारणा सरासरी १ ते २ एकर येते. ही जमिन सुध्दा हलक्या प्रतीची आहे. अक्कलकुवा तालुक्यात स्थलांतरीत आदिवासी कुटुंबाकडे जास्त जमीन तर तळोदा तालुक्यात सर्वात कमी जमिन आढळते. या छोट्या जमिनीच्या तुकड्यात वर्षभर पुरेल इतके उत्पन्न येत नसल्यामुळे त्याला ज्या भागात काम मिळण्याची शक्यता असेल.

त्या भागात त्याला धाव घ्यावी लागते. अन्यथा त्याची उपासमार होते.

पाहणीसाठी निवडलेल्या ८४ कुटुंबापैकी २३ कुटुंबाकडे स्वत:ची जमीन आहे. त्यापैकी १८ कुटुंबाकडे बैलजोडी आहेत. तसेच या कुटुंबाकडे दुधदुभत्यासाठी गायी, बक-या आणि कोंबडयाही पाळलेल्या दिसतात. या पाहणीतील ८४ कुटुंबापैकी १७ कुटुंबाकडे गायी, ९ कुटुंबाकडे बक-या आढळल्या. काही आदिवासी कुटुंबाकडे कोंबडयाही पाळलेल्या दिसतात. त्यापासून त्यांना अंडयाचे उत्पन्न मिळते परंतू कुटुंब मोठे असल्यामुळे त्यावरच अवलंबून राहता येत नाही. त्यामुळे घरातील २ ते ४ व्यक्तींना काम शोधावेच लागते.

५:११ स्थलांतरीत कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न

तक्ता क्र. ५.८

वार्षिक उत्पन्नानुसार कुटुंबाची वर्गवारी

| अ.नं. | तालुका | पाहणीतील कुटुंबे | वार्षिक उत्पन्नानुसार कुटुंबाची वर्गवारी | | | | कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | रु.२०००/ चे आतील | रु.२००१/ ते रुपये ३६००/- पर्यन्त | रु.३६०१/ ते रुपये ७२००/- पर्यन्त | रु.७२०१/ चे वरील | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | तळोदा | १६ | — | १० | ५ | १ | ४२९४ |
| २. | नंदूरबार | २० | १ | ३ | १४ | २ | ५३२० |
| ३. | साक्री | २१ | ३ | ५ | ११ | २ | ४४६७ |
| ४. | नवापूर | १४ | — | ६ | ५ | ३ | ५५०० |
| ५. | अक्कलकुवा | १३ | २ | ६ | ५ | — | ३६१३ |
| | एकुण | ८४ | ६ | ३० | ४० | ८ | ३४८६ |

## ५:१२ कुटुंबाने कामातून शिल्लक टाकलेली मजुरी

गुजराथ राज्यातून स्वगांवी परत येतांना स्थलांतरीत मजूर कुटुंब कामातून शिल्लक टाकलेली मजूरी आणीत असतो. त्यांचा आढावा खालील प्रमाणे देण्यांत येत आहे.

### तक्ता ५.९

### कमवित्या व्यक्तींनी टाकलेली शिल्लक

| अ.नं. | तालुका | पाहणीतील कुटुंबे | मिळवित्या व्यक्तींची संख्या | शिल्लक राहिलेली रक्कम रु. | मिळवित्या व्यक्तींची पाडलेली सरासरी रक्कम. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | तळोदा | १६ | ५५ | २९३०० | ५३२ |
| २. | नंदूरबार | २० | ८३ | ४५६५० | ५५० |
| ३. | साक्री | २१ | ८९ | ५१६०० | ५७९ |
| ४. | नवापूर | १४ | ५२ | १९५०० | ३७५ |
| ५. | अक्कलकुवा | १२ | ४५ | २३२०० | ५१५ |
| | एकुण :- | ८४ | ३२४ | १,६९२५० | ५२२ |

वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, स्थलांतरीत कुटुंबातील व्यक्ती आपला उदरनिर्वाह करुन सरासरी रु. ५०० ते ५५० पर्यन्त ७ महिन्याच्या कालावधीत शिल्लक टाकतो.

## धुळे जिल्हयातील रोजगार हमी योजना :-

धुळे जिल्हयात रोजगार हमी योजना १९७६ पासून लागू करण्यात आली आहे. जिल्हयांची नोंदणिकृत मजूर संख्या २,३६,११५ आहे. तसेच नोंदणी न पालेली मजूर संख्याही मोठया प्रमाणात आहे.

धुळे जिल्हयातील १९८४-८५ ते ८७-८८ मध्ये रोजगार हमीची मंजूर व पुर्ण झालेली तसेच ८८-८९ मध्ये चालू असलेली कामे खालीलप्रमाणे आहेत.

### तक्ता ५.१०

धुळे जिल्हयातील रोजगारहमी योजने खाली घेतलेल्या कामाची माहीती.

| अ.नं. | कामाचे नांव | मंजूर कामे | पैकी ३१.३.८८ पर्यन्त पूर्ण कामे §रद्द कामासह § | शिल्लक व चालू कामे | नविन मंजूर कामे | एकूण चालू कामे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | पाझर तलाव | १३७ | ४४§२७§रद्द | ६६ | २५ | ९१ |
| २. | जोड रस्ते | ११० | १००§८ रद्द§ | २ | — | २ |
| ३. | मृदसंधारण §नालाबंडिंग§ | ४४१ | ४३४ | ७ | — | ७ |
| ४. | इंदिरा आवास घरकुले → | ३११० | २३१४ | ७१६ | ८०० | १५१६ |
| | शौचालय → | ११६० | १८४ | ९७६ | — | ९७६ |
| ५. | सामाजिक वनिकरण | १३६ | १० | १२६ | — | १२६ |
| ६. | फलोत्पादन | ५७ | — | ५७ | — | ५७ |
| प्रकल्प ४ वर्ष/एकूण | | ५१५१ | ३०८६§३५ रद्द§ | १९५० | ८२५ | २७७५ |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, कामाच्या संख्येबरोबर मजुरांची तुलना केली तर रोजगार हमी योजनेतून घेतलेली कामे फारच अल्प प्रमाणात दिसतात. आदिवासी भागातील बरीचशी कामे तांत्रिक कारणामुळे बंद असल्यामुळे व बरीच प्रकल्पाची कामे बन खात्याच्या १९८९ च्या कायदयामुळे हाती घेता आली नाहीत. असे संबंधितांकडून सांगण्यात आले.

वरील बाबींवरून असे स्पष्ट होते की, स्थलांतरीत होणारी कुटुंबे ही निरक्षर आहेत. त्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न रु. ३००० ते रु. ४००० च्या दरम्यान असून ते दारिद्रय रेषेखाली आपले जीवन व्यतीत करीत असतात. त्यांचे जीवन हे मुख्यत: मजूरीवर अवलंबून असते. महाराष्ट्रात पुरेशी कामे उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना उदरनिर्वाहासाठी गुजरा्थ राज्यात धाव घ्यावी लागते व तेथे सतत मेहनत करून आदिवासी मजूर आपला उदरनिर्वाह करून पावसाळ्यातील कालावधीसाठी रु. ५०० ते ६०० शिल्लक टाकतो. ही शिल्लक त्यांना बेरोजगारीच्या वेळी उपयोगी पडते.

## प्रकरण ६ वे

## स्थलांतराची कारणे व दुष्परिणाम

६.१ धुळे जिल्ह्यातील विशेषत: साक्री, नवापूर, नंदूरबार, अक्कलकुवा व तळोदा या ५ तालुक्यातून आदिवासी मजूरांचे गुजराथ राज्यात दरवर्षी मोठया प्रमाणात स्थलांतर होते. गुजराथ राज्यातील बार्डोली, मढी, नवसारी, गणदेवी इ. साखर कारखान्यावर ऊसतोडीसाठी तसेच शेतीच्या कामासाठी ते जात असतात. साधारणत: आदिवासी मजूर ऑक्टोबर/नोव्हेंबरच्या सुमारास निघतात व मे जून पर्यंत परततात. त्यांचे हे स्थलांतर हंगामी स्वरूपाचे असते. धुळे जिल्हयाच्या इतर तालुक्यातूनही थोडया फार प्रमाणांत या भागात आदिवासी मजूर स्थलांतर करीत असतात.

वरील जिल्हयाच्या भागात जवळजवळ ६० टक्के जमीन डोंगराळ उंच उताराची व हलक्या प्रतीची आढळते. बागायतीची येथे फारशी सोय नाही. त्यामुळे शेतीच्या कामाची उपलब्धता ३ ते ४ महिनेच हंगामात असते. बाकी ७ ते ८ महिन्याच्या कालावधीत शेतीची कामे येथे मिळत नाहीत.

६.२ आदिवासी मजूरांच्या स्थलांतराची कारणे.

आदिवासी मजूरांची स्थलांतराची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. या भागात भूमिहिन मजूरांची संख्या मोठी असल्यामुळे त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन मजूरीच आहे. त्यासाठी त्यांना दररोज रोजगार मिळणे आवश्यक असते. या भागात नियमित रोजगार मिळत नसल्यामुळे त्यांना कामाच्या शोधांत इतरत्र जावेच लागते.

२. आदिवासी शेतकऱ्याकडे जमीन कमी व हलक्या प्रतीची असल्यामुळे त्यांना वर्षभर पुरेल इतके उत्पन्न त्यातून निघत नाही, त्यामुळे बरेचसे शेतकरीही शेती हंगामानंतर कामाच्या शोधात असतात.

३. या भागातील बराचसा भाग डोंगराळ आहे. जमीन अत्यंत हलक्या प्रतीची आहे. बागायतीचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे बारमाही रोजगार येथे उपलब्ध होत नाही.

४. गुजराथ राज्यात मजूरांचे प्रमाण कमी असल्यामुळे व औद्योगिकरणामुळे मजूरांची त्यांना सतत गरज भासते. त्यामुळे येथील मजूरांना तेथे काम सहजगत्या मिळते.

५. गुजराथ राज्यात मजूरीचे दर महाराष्ट्राइतकेच असले तरी कामाची उपलब्धता भरपूर प्रमाणात असते. उघड किंवा उगते पध्दतीने ते काम करतात व त्यामुळे त्यांना एकंदरीत मजूरी जास्त मिळते.

६. उसतोडीसाठी जाणारे आदिवासी मजूर आगाउ दिलेल्या रकमेमुळे बांधलेले असतात. त्यामुळे त्यांना ती रक्कम परत फेडण्यासाठी जावेच लागते.

७. आदिवासी मजूर स्थानिक ठिकाणी वर्षभर जेवढा पैसा कमवू शकत नाहीत, तेवढा पैसा ते जास्त काम करून ४ ते ६ महिन्यात तेथे कमवितात. स्थानिक ठिकाणी पैसा संचय होत नाही. तसेच गुजराथमध्ये त्यांचा खर्चावर मर्यादा येत असल्यामुळे त्यांचा पैसा शिल्लक राहतो. आणि त्यामुळे साहजिकच त्यांच्यात स्थलांतराची प्रवृत्ती वाढीस लागते.

८. १. गुजराथमध्ये स्थलांतरीत होणाऱ्या आदिवासी कुटुंबांना केवळ उपजिविका कशी भागवावी, हीच प्रमुख समस्या नजरेसमोर असल्याने इतर सवलतीकडे दुर्लक्ष करतात.

२. गुजराथमध्ये गेल्यावर कोणतेही अल्पावधीचे काम संपल्यावर दुसरे काम मिळण्याची शाश्वती असते.

९. कारखानदार उसतोड मजूरांची मजूरीतून काही रक्कम शिल्लक ठेवतात व कारखाना बंद झाल्यावर ती त्यांना एकत्रित देतात. ही रक्कम रू. १००० ते ५००० पर्यन्त एकत्रित मिळते.

त्यामुळे त्यांना भावी काळात किंवा पावसाळ्यात उपयोग होतो. तसेच त्यांच्या या अल्पसंतुष्टप्रवृत्तीमुळे त्यांना ती रक्कम खूपच वाटते.

१०) धुळे जिल्ह्यातील अशा आदिवासी भागात काही ठिकाणी, रोजगार हमी योजनेची कामे उदा. रस्ते, पाझरतलाव, सामाजिक वनीकरण, रोपवाटीका अशी कामे सुरु असतात. परंतु अशा कामावर फारत थोडया मजुरांना काम मिळते. बाकीच्या मजूरांना दुसऱ्या ठिकाणी रोजगार मिळविण्यासाठी स्थलांतराची जरुरी भासते.

११) कित्येक वर्षांपासून या भागाकडे दुर्लक्ष केल्यामुळे विकासाची कामे पाहिजे तशी घेण्यात आलेली नाहीत त्यामुळे स्थलांतर हे पूर्वापार चालू आहे. तसेच आदिवासीमजूरांमध्ये रोजगारासाठी परराज्यात जाण्याच्या सवयी निर्माण झाल्या आहेत.

## ६.३ स्थलांतर होण्यास प्रवृत्त करणाऱ्या विशेष बाबी

१. स्थलांतर करणाऱ्या ६० टक्के मजूरात भूमिहिन मजूर असल्याने सर्वांना आपआपल्या गावात अगर भागात कामे उपलब्ध होत नाहीत. त्यांचा उदर निर्वाह हा सर्वस्वी मजूरीवरच अवलंबून असल्यामुळे आदिवासीमजूरांना तेथे ६ ते ८ महिने नियमित काम मिळते. त्यामुळे त्यांचा उपजिविकेचा प्रश्न सोडविला जातो.

२. गुजराथ मध्ये मजूरीचे दर बरे आहेत. सर्व पैसा रोखीने मिळत नसल्यामुळे ऊसतोड मजूरांचा अनावश्यक होत असलेल्या खर्चावर मर्यादा येते व त्यामुळे त्यांची मजूरी शिल्लक पडते.

३. शेतमालकाकडून मजूरांच्या सरपण व कपडे यासारख्या मूलभूत गरजा वेळीच भागविल्या जातात. त्यामुळे मजूरीचा थोडा फार पैसा, श्रम व वेळ वाचतो.

४. उन्हाळ्यांत त्यांच्या भागांत निर्माण होणारी पाण्याची टंचाई आणि त्यासाठी होणा-या त्रासाची चिंता आपोआप मिटते.

५. ८ महिने काम केल्यामुळे एकत्र मिळणारा पैसा शेती करण्यास अगर पावसाळ्यातील बेरोजगारीचेवेळी उपयोगी पडतो. त्यामुळे त्याला कर्जासाठी सावकाराकडे धाव घ्यावी लागत नाही व पिळवणुकही होत नाही.

६. ऊसतोड मजुरांची बाकी मजुरी कारखानदार राखून ठेवत असल्यामुळे कारखानदारालाही मजुरांची शाश्वती वाटते व मजुर अर्धवट काम सोडून जात नाही

७. कारखानदाराकडून मजुरांना कपडे, भांडी तसेच आवश्यक गरजेनुसार सवलती दिल्या जातात. त्यामुळे मजूर निर्भयतेने काम पूर्ण करतांत आणि परततांना एकदम मजुरी मिळाल्यामुळे त्यांचा पुढे फायदा होतो.

आदिवासी मजुरांचे स्थलांतरापासून होणारे दुष्परिणाम

१. पहिली महत्वाची बाब म्हणजे स्थलांतर करतांना आदिवासी मजुर आपल्याबरोबर लहान मुलांना घेऊन जातात. त्यामुळे त्यांची मुले शिक्षणापासून वंचित होतात. आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळा निर्माण होतो आणि त्यांची भावी पिढीही तशीच निरक्षर राहण्याची शक्यता वाटते.

२. गुजराथ राज्यांत राहण्याची सोयही उघड्यावरच अगर सपाच्या झोपड्या करुन रहावे लागते. तेथील वातावरण लहान मुलांना पेलवत नाही. त्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडते. केव्हा केव्हा तर लहान मुले व वृध्द मजुर दगावतांत.

३. स्थलांतरामुळे आदिवासी मजुरांना आपल्या राहत्या घराकडे लक्ष देता येत नाही. याकाळांत इतरांकडून त्यांच्या घरांची मोडतोड केली जाते. व त्यामुळे पुन: ते बेघार होतात.

४. काही भागांत कामे काही प्रमाणांत उपलब्ध होत असूनही स्थलांतर केले जाते. त्या भागातील शेतीची कामे मजुराअभावी उरकण्यास शेतकऱ्यांना §शेत-मालकांना § त्रास होतो. शेतीतील मालाचे नुकसान होते. त्यामुळे त्या भागांत उपलब्ध असलेल्या मजुराकडून मागेल त्या मजुरीत कामे करून घ्यावी लागतात. व शेत मालकाला मजुरीसाठी जास्त झळ सोसावी लागते. केव्हा केव्हा तर उत्पन्नापेक्षा मजुरीच जास्त होते. त्यामुळे शेती व्यवसायावर दुष्परिणाम झालेला आढळतो.

५. आदिवासी मजुरांचा स्थलांतराकडे जास्त कल असल्यामुळे वर्षाच्या फारच कमी कालावधीसाठी त्यांच्या मायभूमीत ते राहतात.

६. स्थलांतरामुळे मुकादमासारख्या मध्यस्थी व्यक्तीकडून आदिवासींच्या पिळवणूकीत वाव मिळतो व आदिवासी मजुरांची कुचंबणा होते.

७. ऊसतोड मजुरांना रात्री-अपरात्री ऊसाचे ट्रक भरण्यासाठी जावे लागते. रात्रं-दिवस काम करूनही कामाच्या प्रमाणांत मजुरी मिळत नाही. याबाबतीत ब-याच मजुरांनी नाराजी दाखविली. त्यांना फारच त्रास सोसावा लागतो. त्यामुळे नाईलाजास्तव त्यांचे मानसिक व शारिरिक स्वास्थ्य बिघडते.

८. आजारपणांत ऊसतोड मजुरांची गय केली जात नाही. अशा वेळेस कामावर गेले नाहीतर मजुरी तर मिळतच नाही उलट होणारे नुकसान त्यांच्या मजुरीतुन वसुल करतात.

## प्रकरण ७ वे

## सूचना व शिफारसी

आदिवासी मजुरांचे होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी खालील उपाययोजना सुचविण्यांत येत आहे.

१. आदिवासी मजुरांचे स्थलांतर थांबविण्यासाठी या भागांत कायम-स्वरुपी लहान मोठे उद्योग सुरु केल्यास व नोकऱ्यांच्या स्वरुपात रोजगार उपलब्ध करुन दिल्यास काही प्रमाणांत स्थलांतर कमी होऊ शकेल.

२. शेती सुधारण्याच्या कार्यक्रमात जलसिंचनाच्या कार्यक्रमाला अग्रक्रम देण्यांत आला पाहिजे. त्यामुळे शेती विकसित होऊन दुबीकाखालील क्षेत्र वाढेल व आदिवासी मजुरांना रोजगार उपलब्धतेचे प्रमाण वाढेल. या ठिकाणी पाझर तलावाचे व जलसिंचन योजनांची कामे भरपूर घ्यावीत.

३. स्थलांतर होणाऱ्या तालुक्यांत जमीनी अतिचढ-उताराची आणि डोंगराळ आहे. अशा डोंगर उतारावर झाडे लावण्यासाठी आदिवासींना योग्य मोबदला देऊन प्रोत्साहन दिले पाहिजे, ज्यामुळे डोंगर उतारावरील जमीनींची झीज होणार नाही किंवा पाझर तलाव, मध्यम व मोठे प्रकल्प वाहून आलेल्या मातीने भरणार नाहीत.

४. सामाजिक वनीकरण, रोजगार हमी, अंतर्गत पाझर तलावांची कामे, बीजारोपण यासारखी कामे मोठया प्रमाणावर हाती घेतली पाहिजे, ज्यामुळे प्रत्येक मजुरात आपल्या भागांत किंवा गावांजवळ कामे मिळण्याची अपेक्षा वाढेल व पर्यायाने होणारे स्थलांतर फार मोठया प्रमाणावर थांबण्यास मदत होईल.

५. ज्याठिकाणी रोजगार हमीअंतर्गत पाझर तलाव किंवा रस्त्याची कामे करण्यास वाव आहे, अशा ठिकाणी ५ कि.मी. अंतरापेक्षा जास्त अंतरावरील मजुरां-करितां मजूर छावण्या उभारण्यांत याव्यांत. ही कामे ऑक्टोबर ते मे पर्यन्त नियमित असावीत. मजूर छावणीत मजुरांसाठी सर्व प्रकारच्या मुलभूत गरजा उपलब्ध

करण्यांत याव्यात. तसेच वैद्यकीय व मजुरांच्या मुलांना शिक्षणाची व्यवस्था करण्यांत यावी. त्यामुळे आदिवासी मजुर हा स्थलांतरापासून आपोआप परावृत्त होईल.

६. आदिवासी मजुरांना गरजेच्यावेळी मजुरीची कामे मिळण्याची शाश्वती असली पाहिजे. वर्षात ७-८ महिने त्यांना काम नसते, त्यावेळी विशिष्ट योजनांद्वारे कामे उपलब्ध करुन देवून मागेल त्याला काम व त्यांचा योग्य मोबदला दिला गेला पाहिजे. तसेच बारमाही मजुरीची कामे मिळतीलच असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण झाला पाहिजे.

७. मजुरांची हजेरी व मजुरी वाटप नोंद वही शासकीय अधिका-यां-मार्फत नियमित तपासली गेली पाहिजे. शक्य झाल्यास जिल्हा रोजगार समितीवर प्रकल्प अधिकारी सदस्य नेमून कामाचे मूल्यमापन करावयास पाहिजे.

८. आदिवासी मजुरांना जशी अडचण भासेल त्याप्रमाणे बैलजोडी, गाडी, शेतीची आवश्यक व कामांची अवजारे, विशेष योजनेद्वारे अनुदानरुपाने पुरविली पाहिजे.

९. पाहणी केलेल्या तालुक्यांत जी पडीक जमीन आहे ती कसण्यासाठी भूमीहीन आदिवासींना कायम स्वरुपी दिल्या पाहिजेत. त्यामुळे त्याला काही प्रमाणांत शेतीवर उदरनिर्वाह करतां येईल व रोजगारासाठी स्थलांतराची गरज भासणार नाही.

१०. आदिवासींचे गृह-उद्योग, हस्तकला व्यवसाय, त्यांच्या समाजात वापर होत असलेल्या वस्तुंचे व्यवसाय मोडकळीस आलेले दिसतांत. अशा कारागीरांना कर्ज देऊन वस्तु निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यामुळे त्यांना रोजगार मिळेल व त्यांच्या संस्कृतीचे जतन होण्यास मदत होईल.

११. शेती क्षेत्रांत गुंतुन असलेल्या श्रम बलाला पीक उत्पादनाच्याबाहेर रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी शेती मालावर अवलंबुन असणा-या कृषी उद्योगाचे, जंगल संपत्तीवर आधारित उद्योगाचे तसेच दुग्ध, कुक्कुटपालन, फलोत्पादन आणि भाजीपाला विकास इत्यादी जीवनावश्यक वस्तु पुरविणा-या

उद्योगाची मोठ्या प्रमाणावर वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे आदिवासींना रोजगार उपलब्ध होवून दैनंदिन लागणा-या वस्तुही मोठ्या प्रमाणावर उत्पादित होतील. पर्यायाने स्थलांतर कमी होण्यास मदत होईल.

१२. महाराष्ट्र शासनाने किमान वेतन कायद्याप्रमाणे केलेल्या तरतुदीनुसार सदर स्थलांतरीत होणा-या भागात या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी किंवा प्रचार फार मोठ्या प्रमाणात व्हावयास पाहिजे. जेणेकरुन स्थलांतरीत होणा-या आदिवासींमध्ये असलेली निराशा कमी होऊन अंमलबजावणीस मदत होईल.

१३. पिण्याच्या पाण्याची या भागात फारच टंचाई आहे. ती टंचाई दूर केली पाहिजे. त्यामुळे स्थलांतरास थोडा फार आळा बसेल.

१४. आदिवासी शेतक-याकडे जी पडीत जमीन असते त्यातच वृक्षारोपणा-सारखी कामे त्या त्या शेतक-यांना देण्यात यावी. त्याचा मोबदला शासनाने द्यावा. तसेच लावलेल्या झाडांचे संवर्धनाकरिता काही आर्थिक तजविज शासनाने केल्यास आदिवासींनी लावलेली झाडे ते स्वत: तोडणार नाहीत. त्यामुळे आदिवासींना रोजंदारी मिळेल, पर्यायाने पर्यावरणाला मदत होईल.

१५. स्थलांतरीत होणा-या आदिवासी गावामध्ये विद्युतीकरण झालेले आहे. परंतु प्रत्यक्षात त्या गावात ग्रामपंचायत कार्यालयाने विजेचा उपयोग घेण्याकरिता प्रयत्न केल्याचे आढळत नाही, त्यामुळे त्या भागातील आदिवासींना मुलभूत गरजा उदा. लाईट,पाणी,दळण भागविण्याकरिता मोठ्या गावातील बाजारपेठेकडे जावे लागते. या मुलभूत गरजा भागविण्यासाठी या सुविधा उपलब्ध करुन दिल्यास स्थलांतराचे प्रमाण कमी होईल.

१६. या क्षेत्रात जंगलतोड फार झालेली आहे. नवीन वृक्षारोपणाला फार वाव आहे. आदिवासी मजुरांना याठिकाणी काम देवून त्यांचेकडून वृक्ष लागवड व त्याचे संवर्धन करुन घ्यावे.

## परिशिष्ट क्र. १

### गांवनिहाय स्थलांतरीत मजुरांची संख्या

| तालुका व त्याचा अ.नं. | गावाचे नांव | गावाचा जनगणना क्रमांक १९८१ | आदिवासी लोकसंख्या १९८१ | स्थलांतरीत होणारी सर्व आदिवासी लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १.तळोदा | १. भवर | ८२ | ५६३ | २०० |
| २. | २. कोठार | १० | ६३३ | १०० |
| | ३. रोझवे | ४८ | ६८३ | १०० |
| | ४. लक्कडकोट | २२ | ६५२ | ५० |
| | ५. खार्डी | ९ | ४०४ | २० |
| | ६. खिनोदे | ६१ | ८२९ | १०० |
| | ७. रांझणी | ४७ | ८३३ | ३० |
| | ८. मोदलपाडा | ९० | १०७८ | १०० |
| | ९. सतोजा | ९१ | २७८ | ७५ |
| | १०. रोलवाई | ५४ | ४९२ | १२५ |
| | ११. काजलपूर | ५२ | ४०६ | ५० |
| | १२. रामपूर | ५३ | ७३० | ५० |
| | १३. बोरद | ६६ | २२४१ | २५० |
| | १४. तळवे | ७९ | ८६१ | २५० |
| | १५. आमोणी | २५ | ५३५ | १०० |
| | १६. चौगांव | २४ | ३३० | ८० |
| | १७. रापापूर | २३ | ५०४ | १२० |
| | १८. सुरगव्हाण | ५६ | ५२२ | ८० |
| | १९. गाढावली | ११ | २१२ | ४० |
| | २०. पाडळपूर | २१ | ६७८ | २० |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १. तळोदा | २१. शिर्वे | ३४ | ८५२ | २५० |
| | २२. ब्राल्हेरी | ७ | २७४ | २५० |
| | २३. एकधड | ५ | १३४ | ९० |
| | २४. सोजरवारा | ६ | ७९ | ५० |
| | २५. वियामाळ | २७ | ९८ | ६० |
| | २६. आष्टे बोरद | ६७ | ३४ | २० |
| | २७. कळमसरे | ६५ | २४४ | १२५ |
| | २८. मोरवड | ७८ | ३८२ | १०० |
| | २९. चौगांव | [illegible]५ | ४१९ | २१० |
| | ३०. सलसाडी | ६३ | ४६३ | १४० |
| | ३१. मोहिदा | ६४ | ६७९ | १४० |
| | ३२. उमरी | ७४ | २४५ | १२० |
| | ३३. तळोदा | ९२ | ४९ | ३५ |
| | ३४. प्रतापपूर | ४६ | ११०७ | २५० |
| | ३५. राणीपूर | ३८ | ११३४ | २५० |
| | ३६. नलगव्हाण | ८८ | ५७३ | २५० |
| | ३७. आमलाड | ८० | १४३६ | ३९० |
| | ३८. सोमावल | ८७ | १३६३ | २५० |
| | ३९. बुधावली | ८४ | ५८७ | २५० |
| | ४०. लोभाणी | ८६ | ४४२ | १५० |
| | ४१. गौळजापाडा | ८५ | ४७२ | १५० |
| | ४२. इच्छागव्हाण | ३ | ६८४ | १२५ |
| | ४३. कुडवे | २ | ३६ | २० |
| | ४४. सावर | १ | ११० | ९० |
| | ४५. सवेरपाडा | ३९ | ४८९ | १५० |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| १.तळोदा | ४६. पिंपरपाडा | ४ | २४४ | १५० |
| | ४७. राजविहिर | ५८ | १२७३ | १०० |
| | ४८. आमलपाडा | ३१ | ७१४ | ३०० |
| | ४९. करडे | ४१ | १०५३ | १६५ |
| | ५०. दलेलपूर | ६० | १०४१ | ११५ |
| | ५१. माळदा | १८ | ८७४ | १५० |
| | ५२. लाखापुर | १९ | १४७८ | १५० |
| | ५३. जूवानी | १६ | २९५ | १५८ |
| | ५४. छोटा धनपूर | ४४ | ८३५ | १२० |
| | | | ३३६४८ | ७३३५ |
| २.अक्कलकुवा | | | | |
| | १. सिंगपूर | १४७ | ५२६ | १०० |
| | २. भाखलपूर | १४६ | ८२० | ४० |
| | ३. आंबाबारी | १०२ | ९५२ | २५० |
| | ४. दसरापादर | १०१ | १६२ | १५० |
| | ५. रतनबारा | १०० | ३६० | ८० |
| | ६. भराडीपादर | ९२ | ३८७ | ७५ |
| | ७. ककरपाडा | १४२ | ४८८ | ८९ |
| | ८. मोरंबा | ९८ | १५८२ | १५९ |
| | ९. मालपाडा | १८ | ५१२ | २०० |
| | १०. पाण्याजिहीर | | | ६० |
| | ११. आमलीबारी | ८९ | २७९ | ५० |
| | १२. घंटाजी | १२१ | ४४० | १०० |
| | १३. कंकाळा | १०९ | ७५४ | ८५ |
| | १४. रायसिंगपूर | १२५ | ४५४ | ४० |
| | १५. खापर | १८३ | १८५९ | ३५ |
| | १६. कोराई | १८० | ६९४ | ४० |
| | १७. आमची फळी | ११० | ६०० | २५ |
| | १८. चांदूर | १७६ | २७३ | १० |
| | १९. खाटेपाणी | १४० | ११०० | १५० |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| २. अक्कलकुवा | | | | |
| | २०. अंकुशविहीर | १२२ | ७७८ | ८० |
| | २१. खाडके | १६१ | १९६ | २५ |
| | २२. जांभळी | ४३ | ६७६ | १५ |
| | २३. कुंभारखान | १६० | २८२ | ५ |
| | २४. गंगापूर | १११ | ६०४ | ७५ |
| | २५. काकरपाडा | १४२ | ४८८ | ५० |
| | २६. गलोके बु. | ११९ | १३० | १० |
| | २७. जानीअंबा | १४८ | ६३१ | ३५ |
| | २८. माडवीआंबा | ११६ | ३९८ | २५ |
| | २९. सिंदूरी | ४ | ७२५ | २५ |
| | ३०. चिगलखाडी | ३ | ३५८ | ३१ |
| | ३१. उने[illegible] | | | ४५ (?) |
| | ३२. बामणी | ६ | ५९६ | १६ |
| | ३३. गोमण | ५ | १०२२ | ५५ |
| | ४. मुखडी | ८ | २५६ | १० |
| | | ~~११३८२~~ | ११३८२ | २२४० |
| ३. नवापूर | १. चितवी | ७९ | ५८० | ४४ |
| | २. वडसत्रा | ८० | १०९० | २५ |
| | ३. चोरविहीर | ७८ | ६६९ | १५ |
| | ४. खांडबारा | ५७ | १३४१ | ५३ |
| | ५. बाटवी | ६९ | ३९६ | ७२ |
| | ६. खोरने | ३४ | १३६ | १४ |
| | ७. सोनपाडा | ५४ | ११७ | १०९ |
| | ८. करंजाळी | ५५ | १६११ | ५९ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ३.नवापूर | ६४. मवरे | १०८ | ३१३ | १५ |
| | ६५. देवळीपाडा | ९० | १६६२ | २८ |
| | ६६. वडफळी | ४७ | ११६३ | ४५ |
| | ६७. तारापूर | ४२ | ९५४ | ९ |
| | ६८. जामदा | ३१ | ६६२ | २८ |
| | ६९. देवमोगरा | ४४ | ८२८ | १९ |
| | ७०. नावली | ६६ | ११११ | २१३ |
| | ७१. निजामपूर | ५१ | १३९५ | ६ |
| | ७२. नवारे | ५२ | ६१७ | १३ |
| | ७३. मौलीपाडा | ५० | ४६० | २० |
| | ७४. खोकसा | १३३ | ७९१ | १२ |
| | ७५. कामोद | १२५ | ९२३ | १९ |
| | ७६. कोटखांब | १३२ | ४४० | १० |
| | ७७. सोनारे | ४० | २१७५ | २५० |
| | ७८. श्रावणी | ५६ | १२०४ | ८३ |
| | ७९. वडदे | ७३ | ६७२ | २० |
| | ८०. रोही | नवीन | | २५ |
| | ८१. मरोड | ४३ | ३६५ | ११ |
| | ८२. पाळीपाडा | नवीन | | २३ |
| | ८३. पळसून | ८३ | ८६३ | ४६ |
| | ८४. ढोंग | ७१ | १०८६ | ७४ |
| | ८५. चिखली | ३७ | ५९१ | ५६ |
| | ८६. वासदा | ३० | ५५१ | ३४ |
| | ८७. मेनतलाव | नवीन | | २४ |
| | ८८. पाचंबी | २६ | ४९७ | ३५ |
| | ८९. बेडकि | ११७ | ५९४ | १५ |
| | ९०. खोलघर | ८६ | ६७४ | १६ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ३. नवापूर | ९१. वांझले | ८७ | १३४ | ७४ |
| | ९२. बंधारपाडा | ९३ | १६१८ | १०७ |
| | ९३. देवळीपाडा | २० | ३८३ | ९२ |
| | ९४. वाकीपाडा | १० | ९२५ | २१ |
| | ९५. करंजी खुर्द | ९ | ६८४ | २२ |
| | ९६. खोकडा | ४ | ११५७ | ११० |
| | | | ८६,६६३ | ५,१९९ |
| ४. साक्री | १. निजामपूर | ५० | ४७३ | ३५० |
| | २. भामेर | ४८ | २६५ | २०० |
| | ३. सालटेक | ४७ | ३६६ | २०० |
| | ४. जैताने | ४९ | ५८० | ४५० |
| | ५. खुडाने | ४६ | ३०१ | २५० |
| | ६. आखाडे | २२ | ४१० | २०० |
| | ७. फोफरदे | २१ | १८३ | १०० |
| | ८. वाजदेरे | २३ | २३८ | १०० |
| | ९. रुणमळी | २४ | ७७३ | १५० |
| | १०. वर्धाने | ६३ | १४० | १०० |
| | ११. भडगांव | ६४ | ६४ | ५० |
| | १२. टेंभे प्र.भामरे | ६६५ | ३६५ | २५० |
| | १३. वासखेडी | ४४ | ११९ | ७८ |
| | १४. जामकी | ४३ | २४३ | १७५ |
| | १५. परकोरजे | १०७ | ६५३६ | १२५ |
| | १६. अमकामी | २७ | १९० | १०० |
| | १७. उभरांडी | ५२ | १७८ | ८० |
| | १८. होडदाणे | ५३ | १०५ | १०५ |
| | १९. राजगांव | ५१ | ११६ | ७५ |
| | २०. वेहरेगांव | ५४ | ९६ | २८ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ३. नवापूर | ९. मक्वाणा | ६८ | ८८४ | १०५ |
| | १०. मेंदिपाडा | ६७ | ६११ | २१ |
| | ११. शेगवे | ५९ | ~~१४५८~~ १३२९ | ~~२४~~ ३२ |
| | १२. बोरचक | ५८ | १४५४ | २४ |
| | १३. निंबोणी | ७० | ६६३ | २४ |
| | १४. मालवण | ६८ | १४८४ | ४८ |
| | १५. रायपूर | १११ | १५९७ | २५ |
| | १६. बोकळझर | १०५ | ४९८ | २ |
| | १७. झामणझार | ५ | १६६८ | ७२ |
| | १८. करंजी | ११५ | १४०५ | ३० |
| | १९. कुकराण | ११३ | ३३० | १५ |
| | २०. सुळी | १०३ | १४२१ | ६० |
| | २१. सोनखडके | ११४ | ५८० | २० |
| | २२. पिंपराण | १२६ | ४२४ | १५ |
| | २३. करंजवेल | १९ | १४२५ | ३५ |
| | २४. बिजगांव | ६४ | ८९३ | १३४ |
| | २५. घोगळपाडा | ६३ | २२६६ | २८ |
| | २६. खोलविहीर | ८५ | ५४२ | ८६ |
| | २७. निमरदेड | २१ | ५४३ | ५५ |
| | २८. खानपूर | १२२ | १४१२ | ७७ |
| | २९. वागदी | ५३ | ३१२ | ५६ |
| | ३०. मोरकरंजे | १२४ | ४६२ | २० |
| | ३१. जामनपाडा | नवीन | — | ५७ |
| | ३२. महालकडू | ४१ | ५७५ | ७० |
| | ३३. भरडू | ४३ | ३६५ | १०० |
| | ३४. केळी | ७७ | ८२६ | १०० |
| | ३५. रायडकी | ८१ | १२२५ | ११५ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ३. नवापूर | ३६. पिंपके | ८४ | ५५१ | ४१ |
| | ३७. मोगराणी | ६५ | २१०७ | २१० |
| | ३८. चौकी | ११२ | ११५४ | ५ |
| | ३९. सावरट | १०१ | १४२१ | १६ |
| | ४०. वडखुट | ९९ | ७८२ | ४३ |
| | ४१. घोडजामणे | ११ | ५६१ | ८ |
| | ४२. जामतलाव | १०६ | ८०९ | २४ |
| | ४३. विजापूर | १२ | ७४७ | १९ |
| | ४४. बोरपाडा | ११८ | १३४३ | १९ |
| | ४५. नागशिरी | १२७ | २३११ | १०४ |
| | ४६. सरी | १३१ | ३१४ | ५२ |
| | ४७. नवागांव | १८ | २१८० | ३० |
| | ४८. डोकारे | नवीन | — | २५ |
| | ४९. सुकवेल | नवीन | — | २० |
| | ५०. गडद | ७ | २६३२ | ५६ |
| | ५१. वडकळंबी | १२८ | १८९९ | ३० |
| | ५२. बोरझीर | १३० | ३१४ | ५१ |
| | ५३. उकळापाणी | १२९ | १२४ | ३८ |
| | ५४. अंजने | ३३ | १३४ | २६ |
| | ५५. वावडी | २५ | ४३५ | ३०० |
| | ५६. बिलगव्हाण | २७ | ५४३ | ५० |
| | ५७. बुंधारे | २८ | १४१ | ४३ |
| | ५८. दुधाचे | २९ | ५३६ | ७९ |
| | ५९. बिलबारे | ३५ | १०४५ | १८ |
| | ६०. धनराट | १०४ | २७०१ | ८८ |
| | ६१. चेडापाडा | २३ | ७६३ | २०० |
| | ६२. बिलमांजरे | ८ | ६४६ | १०८ |
| | ६३. बारी | १०९ | ४६६ | २४ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ४. साक्री | २१. दुसाणे | २० | ११९३ | ४० |
| | २२. बक्साणे | १७ | ६६६ | २९ |
| | २३. कद्रे | १९ | २३९ | ५० |
| | २४. सतमाने | १८ | १३० | -- |
| | २५. हंदवे | १६ | ४८४ | १५ |
| | २६. दही ख्रु. | नवीन | | २५ |
| | २७. ऐचाळे | १४ | ७२४ | ६५ |
| | २८. लोणखेडे | ५८ | १३१ | २० |
| | २९. छावडी | ५७ | १३९ | १० |
| | ३०. आमोदे | ५६ | १३० | १० |
| | ३१. म्हचाळे | ५५ | २९५ | ७५ |
| | ३२. घाणेगांव | ६१ | २७९ | १६ |
| | ३३. फोफरे | ५९ | ८९ | २५ |
| | ३४. दही बुं | नवीन | | |
| | ३५. उभंड | १३० | १८१ | ९० |
| | ३६. आयने | १३१ | ६२ | १२ |
| | ३७. मळखेडे | १३२ | ११४ | ७५ |
| | ३८. नागपूर बु. | १२१ | १०० | १५ |
| | ३९. भडगांव | १४० | १७९ | ३५ |
| | ४०. दिघावे | १५२ | ५२७ | .. |
| | ४१. गणेशपूर | १५१ | ३१३ | ३५ |
| | ४२. उमरी | १५४ | ३१५ | २० |
| | ४३. धाडणे | ११५ | ८५५ | १३० |
| | ४४. रोबपूर | ११४ | २०७ | ७० |
| | ४५. कासारे | १२० | ७८४ | १२० |
| | ४६. वेल्हे | ४ | १०२४ | २९० |
| | ४७. मालपूर | ११९ | ४४२ | ९० |
| | ४८. म्हसदी प्र. नेर | १३८ | १०२६ | १५० |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ४. साक्री | ४९. वसमार | १३७ | २३८ | ३० |
| | ५०. चिंचखोडे | १३६ | २६१ | २५ |
| | ५१. दहिवेल | ३९ | ४४०१ | ३७० |
| | ५२. घोडदे | ७५ | ५२८ | ३०० |
| | ५३. किरवाडे | ७७ | २३८ | १०० |
| | ५४. रोहोणी | ८२ | १२८५ | १५० |
| | ५५. चौपाळे | ३४ | ६५५३ | ३२५ |
| | ५६. शिरसोळे | ८९ | १०१७ | २५० |
| | ५७. धानेर | ३२ | १५४१ | ३७५ |
| | ५८. टिवणी | १० | ९२८ | १०५ |
| | ५९. खोरी | १३ | २५६ | २०५ |
| | ६०. पेटाळे | १२ | १५४ | ४१० |
| | ६१. जामकी | ४३ | २४३ | ३०० |
| | ६२. ब्राम्हणवेल | २९ | ५३६७ | १७५ |
| | ६३. वाभुळदे | ४२ | ५९३ | १६० |
| | ६४. जांभोरे | ४१ | ५६९ | ८५ |
| | ६५. चिपळी | २५ | १०९७ | २५५ |
| | ६६. छडवेल | ७३ | ५०२ | ३१० |
| | ६७. कोर्डे | ८ | १७५७ | ५१ |
| | ६८. वासमर | १३७ | २३८ | १०५ |
| | ६९. शेवाळी | १५६ | ६८४ | १५३ |
| | ७०. अ.पाडे | १३३ | ७७ | ४० |
| | ७१. साक्री आंबा-पूर | ६९ | १४०४ | १०५ |
| | ७२. कावळे पेटेगपार | ७० | ४९७ | १५० |
| | ७३. रोताले | ४० | ७०२ | ११० |
| | ७४. छडवेल प | ७३ | ५०२ | ६० |
| | ७५. भोकळे | नवीन | | २५ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ४. साक्री | ७६. नांदवन | १२५ | २८९ | ३५ |
| | ७७. कुडाश्ी | १०५ | २८४४ | १६७ |
| | ७८. पिंपळगांव खुर्द | १७२ | ६१६ | १८० |
| | ७९. जेबापूर | ८४ | ३३२ | ७५ |
| | ८०. कुत्तरखांव | ८८ | ८५८ | १०० |
| | ८१. वासखेडो | ४४ | ११९ | ५० |
| | ८२. वारसस | २६ | ३६० | २५० |
| | ८३. मक्गांव | १०२ | १४०५ | १०० |
| | ८४. टेंभे | ९३ | ९३० | १६० |
| | ८५. देगांव | ११३ | १४७ | १०१ |
| | ८६. उमरपाडा | १०० | ८४६ | १७५ |
| | ८७. वोपखेल | १६५ | १५१२ | २६५ |
| | ८८. डांगशीखाडे | १६६ | ४४७ | २४० |
| | ८९. पिंपळनेर | १०८ | २४१८ | ९० |
| | ९०. रोकवारी | १५८ | ५८५ | ४२ |
| | ९१. देशशिखोडे | १५७ | ५७९ | |
| | ९२. पेरगांव | १८२ | ११५८ | |
| | ९३. वल्हावे | ४ | १०२४ | ५५ |
| | ९४. शेवगे | १६२ | १५३ | |
| | ९५. सामोदे | १०९ | १४८१ | ८५ |
| | ९६. म्हसदी पिंपळनेर | १३८ | १०८६ | |
| | ९७. चिकसे | ११२ | २२१ | |
| | ९८. जिरापूर | १११ | ८८ | ७५ |
| | ९९. कडयाळे | १५९ | २२५ | |
| | १००. शेवडीपाडा | १५६ | ६८४ | |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ४. साक्री | १०१. कोकणगांव | १६२ | ५४३ | |
| | १०२. सितारामपूर | १८१ | ४१६ | |
| | १०३. मंडाणे | १६० | ५६६ | ३५ |
| | १०४. धामणहारा | १७८ | ३४० | |
| | १०५. विरखेल | १७९ | ३२४ | |
| | १०५ | | ७६,५१७ | ११,९०७ |
| ५. नंदूरबार | १. आष्टे | १३६ | ६५३ | २०५ |
| | २. ओझर्दे | १३१ | ११६ | ३५ |
| | ३३. ठाणेपाडा | १३७ | १८५६ | २०० |
| | ४. गंगापूर | १३८ | २६२ | १०० |
| | ५. खामगांव | ९४ | ७२४ | ७५ |
| | ६. बिलाडी | ९३ | ३७४ | ४० |
| | ७. टोकरतले | ११५ | ८७९ | ५० |
| | ८. त्रिरचक्र | ११७ | ७११ | ३५ |
| | ९. वडगांव | ११६ | २३० | १८ |
| | १०. उमज | ८४ | ९१२ | २०५ |
| | ११. वडजाखण | ८५ | ५५९ | १७५ |
| | १२. शिरवाडे | ९० | ३७० | ६६ |
| | १३. वाघाले | १३२ | २३७८ | ७५ |
| | १४. श्रीरामपूर | १३३ | ८३४ | ७० |
| | १५. ढेकवद | १३१ | ८४९ | २५ |
| | १६. वालआमराई | १२० | १२० | ७० |
| | १७. पाचोराबारी | १२३ | ८४६ | ५० |
| | १८. धिरजगांव | ९२ | ३५५ | ७५ |
| | १९. जकले | ८९ | ६५४ | ९० |
| | २०. रनाले | ८६ | ६१४ | ८० |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ५. नंदूरबार | २१. काळबा | १२१ | ३१८ | २५ |
| | २२. खैराळे | १२५ | ११७ | ८५ |
| | २३. सोनगीर | १२४ | २७५ | २५ |
| | २४. नागसर | १३० | ५६८ | २५० |
| | २५. नवागांव | १२९ | ६१८ | १८५ |
| | २६. रनाळा | १०८ | ८१७ | ९२ |
| | २७. कार्ली | १०३ | २९६ | ३७ |
| | २८. वनकुटे | १०९ | ९ | .. |
| | २९. घोटाणे | १०७ | १५३ | २३ |
| | ३०. व्याहळी | नवीन | | ४१ |
| | ३१. आसाणे | १४३ | ८२ | २९ |
| | ३२. खोक्राळे | १४४ | १८० | ३२ |
| | ३३. माडळ | १३९ | ३४६ | ६६ |
| | ३४. तिळाळी | १४० | २७८ | २७ |
| | ३५. आख्तवाडे | १५१ | १३ | उजाड |
| | ३६. हाट्टी | १५२ | १८९ | १६ |
| | ३७. रजाळे | १५० | २१८ | २३ |
| | ३८. ढंढाणे | ११० | ३६८ | १५ |
| | ३९. खार्दे खुर्द | १४९ | १४४ | ३२ |
| | ४०. तळवाडे बु. | १४८ | ३८३ | १४ |
| | ४१. बळवंड | १४१ | ३५६ | २८ |
| | ४२. सैताणे | १४२ | ३०६ | ४१ |
| | ४३. वैंदाणे | १४६ | ३७० | ३२ |
| | ४४. मोयाणे | १४७ | ... | उजाड |
| | ४५. माळखांड | १४५ | ... | उजाड |
| | ४६. भाडवड | १०४ | २६३ | ७५ |
| | ४७. वेळदाणे | १०५ | ६२ | २२ |
| | ४८. कद्रे | १०२ | ३३ | १७ |

| १ | २ | | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|
| ५. नंदूरबार | ४९. | निभेल | १०१ | २०४ | १४ |
| | ५०. | खोंडामळी | ४७ | २५५ | १२४ |
| | ५१. | भाकेर | ६८ | २२३ | ४७ |
| | ५२. | तिसी | ६१ | २११ | १९ |
| | ५३. | नगाव | ६२ | १९० | २१ |
| | ५४. | शिंदगव्हाण | ६४ | २३९ | १५० |
| | ५५. | विखरण | ४८ | ३६१ | ८० |
| | ५६. | कळमाडी | ६६ | १४० | ५० |
| | ५७. | काजळदे | | | ५० |
| | ५८. | धामडोद | ४४ | ३२९ | १३३ |
| | ५९. | बामडोद | ४६ | ६२ | १० |
| | ६०. | वडवद | ६७ | १०७ | ३७ |
| | ६१. | बाहयाणे | ५७ | २८३ | ३० |
| | ६२. | आराळे | ५५ | १८१ | १५ |
| | ६३. | सातुर्खे | ५६ | १९२ | १५ |
| | ६४. | जूनमोहिदे | ६० | २८० | ६८ |
| | ६५. | होळतरनाळा | ५९ | २१७ | ४० |
| | ६६. | कार्कर्दे | ६३ | २४३ | ८५ |
| | ६७. | हाटमोहिदे | ५१ | ७६१ | ... |
| | ६८. | कोपर्ली | ५२ | ५१८ | २०० |
| | ६९. | आमळ्ये | ५३ | ७० | ४० |
| | ७०. | मांजरे | १८ | २०० | २०० |
| | ७१. | ओसर्ली | ५४ | ३६० | ८५ |
| | ७२. | कोरीट | १६ | ५४३ | ... |
| | ७३. | सावळदे | १[illegible] | १४६ | १५ |
| | ७४. | समशेरपूर | १९ | ४३४ | ... |
| | ७५. | बोराळे | १७ | ५८१ | ... |

...

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ५. नंदुरबार | ७६. सुजालपूर | १८ | ३१८ | ... |
| | ७७. नाशिंदे | ४९ | १४२ | १५ |
| | ७८. खापरखोडा | ५० | १३८ | १५ |
| | ७९. शिंदे | १४ | १७५ | ... |
| | ८०. ल.शहादा | २० | ७०८ | ५५ |
| | ८१. खोडसगांव | १३ | २७९ | ११५ |
| | ८२. कोकदे | २१ | ११११ | १५० |
| | ८३. भागसरी | ४५ | २५८ | १६० |
| | ८४. पातोडा | ७५ | ७१४ | ११० |
| | ८५. होळ तहवेली | ७१ | २१० | ८० |
| | ८६. शकसतोडे | नवीन | | १०५ |
| | ८७. वाघोदे | ७४ | ३८४ | ७० |
| | ८८. पळाशी | २२ | ३६१ | ५० |
| | ८९. वरूळ | १२ | १५४ | ४३ |
| | ९०. धुळी | ४२ | २२४ | ५७ |
| | ९१. पथराई | ११ | ६१३ | ३० |
| | ९२. धमडाई | २३ | ५८२ | २५० |
| | ९३. अमरावे | | | ५० |
| | ९४. आडची | २४ | ७८६ | ३० |
| | ९५. नंदुरबार | | | १०५ |
| | ९६. चौपाळे | १८ | ६७१ | ५० |
| | ९७. दहिंद्रके खु | ७३ | ६६ | १२ |
| | ९८. दहिंद्रके बु. | ७२ | ४१६ | ४० |
| | ९९. कठोरे | ७० | ५८ | ३० |
| | १००. उमर्दे खुर्द | ६९ | २३८ | ७५ |
| | १०१. अक्राळे | ९९ | १३२ | ४८ |
| | १०२. वडबारे | १०० | १३१ | ४९ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ५. नंदूरबार | १०३. जाबद | ९७ | १६६ | ९० |
| | १०४. चाकडे | १११ | ३०५ | १५० |
| | १०५. वासदरे | ११२ | ३८२ | १३५ |
| | १०६. भोणे | ९६ | १८४ | ५२ |
| | १०७. नळवे खु. | ७६ | ४८४ | ३५ |
| | १०८. नळवे बु. | ७७ | ३१८ | ४५ |
| | १०९. करणखोडा | ७९ | ६१८ | ७५ |
| | ११०. लोणखोडा | ४१ | ४५३ | ५० |
| | १११. सुंदर्दे | ७८ | १०८४ | ११० |
| | ११२. करजकुपे | ४० | ४५३ | १६० |
| | ११३. नांदर्खे | ११३ | ६६८ | २५० |
| | ११४. दुधाके | २५ | ४११ | १२० |
| | ११५. प्रिंप्री | ११४ | ५०६ | ७० |
| | ११६. उमर्दे बु. | ११८ | ५२३ | १२५ |
| | ११७. नारायणपूर | ९१ | ५५९ | २५ |
| | ११८. कुक्सरे | नवीन | | ३५ |
| | ११९. धानोरा | ४ | ३०४६ | ७१ |
| | १२०. इसाईनगर | २ | ९२० | ६३ |
| | १२१. नंदपूर | ३० | ४३२ | ४६ |
| | १२२. आर्डीतारा | ३४ | ६४४ | ३५ |
| | १२३. मालपूर | ३१ | ७५२ | ६३ |
| | १२४. पावला | ८३ | ११२९ | ११९ |
| | १२५. मंगरूळ | ३२ | ४८२ | ८५ |
| | १२६. वसलाई | १ | ६६८ | ५८ |
| | १२७. तारापूर | ३ | २६९ | ५० |
| | १२८. वेळावद | ७ | ५४३ | ५७ |
| | १२९. लोया | ३८ | ९५९ | ६५ |
| | १३०. शिवपूर | २७ | २६७ | ४५ |

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ५. नंदूरबार | १३१. करंजवे | ५ | ४३३ | ३२ |
| | १३२. पिंपळोद | २९ | १४५६ | ६९ |
| | १३३. नटावद | ३७ | १४८६ | ७६ |
| | १३४. भवाणीपाडा | ८१ | ३७६ | ३९ |
| | १३५. दैवपूर | ८० | ३१४ | २२ |
| | १३६. उमरगांव | २८ | २७२ | १७ |
| | १३७. काढेली खु. | ३६ | १५४० | १५० |
| | १३८. कोठडे | ८२ | ६६७ | ३० |
| | १३९. वाकशेवा | ३५ | ६२७ | २५ |
| | १४०. निंबोणी | ८७ | २७९ | २५ |
| | १४१. जांभोळी | नवीन | | ५० |
| | १४२. भवाळी | नवीन | | १२० |
| | १४३. राजापूर | २५ | ४६९ | १०५ |
| | १४४. धुळवद | ९ | ६६८ | ३५ |
| | १४५. व्याहूर | ८ | ६२९ | २५ |
| | १४६. रोजवे | ६ | ५८१ | ४० |
| १४६ गावांमध्ये ११ गांवे ओसाड आहेत. | | | ६५,३६८ | ९,४४७ |

## - गोषवारा -

### तालुका निहाय स्थालांतरीत मजुरांची संख्या

| अ.नं. | तालुका | एकुण गावे | स्थालांतर होणारी गावे | आदिवासी लोकसंख्या | स्थालांतर झालेले मजूर | स्थालांतर मजुरांचे एकुण आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | तळोदा | ९२ | ५४ | ३३,६४८ | ७,३३५ | २१.७९ |
| २. | नंदूरबार | १५२ | १३५ | ६५,३६८ | ९,४४७ | १९.४५ |
| ३. | साक्री | १८२ | १०५ | ७६,५१७ | ११,९०७ | १५.५६ |
| ४. | नवापूर | १३३ | ९६ | ८६,५६३ | ५,१९९ | ६.०० |
| ५. | अक्कलकुवा | १८७ | ३४ | १९,३८२ | २,२०० | ११.५६ |
| | एकुण | ७४६ | ४२५ | २,८१,४७८ | ३६,१२८ | १२.८३ |

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य पुणे१
धुळे जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाचा सीमेलगतच्या राज्यात
होणा-या स्थलांतराचा प्रश्न.

प्र प त्र क्र. २

स्थलांतर करणा-या आदिवासी कुटुंबाची माहिती.

[ चौक १]

सर्वसाधारण माहिती/ओळख

१] कुटुंब प्रमुखाचे नांव :

२] अनुसूचित जमातीचे नांव :

३] गावाचे नाव :

४] पाड्याचे नाव :

५] तालुका :

६] जिल्हा :

[ चौक २ ]

कुटुंबाची माहिती

| | |
|---|---|
| १] कुटुंबातील एकूण व्यक्ती | |
| २] १२ वर्षावरील व्यक्ती | |
| ३] साक्षर | |
| ४] निरक्षर | |
| ५] कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती | |
| ६] व्यवसाय/जोड व्यवसाय | |

[ चौक ३]

## कुटुंबाची जमीनधारणा व पिके

६] शेती — बागायत[हे/आर] — कोरडवाहू[हे/आर]

१] मालकीची जमीन

२] भाड्याने कसण्यासाठी घेतलेली जमीन

३] एकूण कसत असलेली जमीन

४] शेतीतील सिंचन साधन — विहीरी/कालव्याच्या पाण्याने/ओढयाच्या पाण्यावर

[१] [२] [३]

७] १९८८-८९ या वर्षात कोणती पिके घेतली. — पिकाचे नांव — अंदाजित/क्षेत्र — उत्पन्न रुपयात

१] ____________________

२] ____________________

३] ____________________

४] ____________________

५] ____________________

एकूण ____________________

८] १९८८-८९ या वर्षाचे एकूण उत्पन्न किती: 

१] शेतीपासून

२] दुधदुभत्यापासून

३] नोकरी

४] मजूरी/रोजंदारी

५] इतर व्यवसाय

[ स्पष्ट करा] ____________________

एकूण उत्पन्न ____________________

[ स्पष्ट करा] ______________________________

एकूण उत्पन्न ______________________________

[ चौक ४ ]

<u>पशुधन बाबत माहिती</u>

९] पशुधन [गाय, बैल, म्हैस, इ. ] : संख्या

१] बैल

२] गायी

३] बकरी

४] इतर

५] कोंबड्या

१०] शेतमजुरी/इतर मजुरी करीत असल्यास मजुरी काम करणाऱ्यांची संख्या. :

[ चौक ५ ]

<u>स्थलांतरबाबत माहिती</u>

१] कुटुंब कोणत्या ठिकाणी व काय कामासाठी जाते. : ठिकाण : तालुका :

जिल्हा : राज्य :

२] कोणत्या कालावधीत[महिन्यात]: तुम्ही दुसरीकडे जाता? ______________________________

३] स्थलांतर करण्याची तुम्हाला जरूरी का भासते? ______________________________

४] कुटुंबातील किती व्यक्ती बाहेरगावी जातात. ______________________________

५] या सर्व व्यक्तींना काम मिळते का? होय/नाही.
तेथे करीत असलेल्या कामाचे
स्वरूप :
तुमच्यापैकी किती व्यक्ती कारखान्यात/इतर कामासाठी लावले जातात. ?

| व्यक्तीचे नांव | पु/स्त्री | करीत असलेले काम | मिळालेल्या मजूरीचे दर |
|---|---|---|---|
| १] | | | |
| २] | | | |
| ३] | | | |
| ४] | | | |
| ५] | | | |

६] तुम्ही नेत असलेल्या सर्वच कमविल्या : व्यक्तींना काम मिळते का?
काम मिळत नसल्यास किती व्यक्तींना काम मिळत नाही? व किती दिवस काम मिळत नाही.

७] तुम्ही दुस-या राज्यात जाता ते कोणाच्या सूचनेप्रमाणे/कोणाच्या सहाय्याने/ओळखीने/ठेकेदाराच्या मदतीने/इतर मार्गाने[खुलासा करा]

८] जाण्यापूर्वी काम नक्की मिळेल याची खात्री दिली जाते काय? दिली जात असल्यास कोणाकडून?

९] जाण्यापूर्वी तुम्हाला ठेकेदार/कारखानदार यांचेकडून काही आगाऊ रक्कम वस्तुस्वरूपात किंवा पैशाच्या स्वरूपात मिळते का?
मिळत असल्यास कोणती, किती व काय अटीवर तुम्हाला ती मिळते?

१०] या कामासाठी ठेकेदार तुमच्याकडून किती रक्कम घेतो.

११] तुमचे मजूरीचे दर कामाला जाण्या पूर्वीच ठरविले जातात का?

१२] अ] मजुरी कोणत्या स्वरूपात मिळते? व किती दिवसांनी?

१३] अ] तुम्हाला मिळालेल्या रकमेची कार्यालया दृष्टीने विभागणी कशी असते?

[ संपूर्ण १ वर्षाच्या कालावधीसाठी ]

१] धान्यासाठी
२] तेलासाठी/साबण
३] कपड्यासाठी
४] घर जागेचे भाडे
५] ठेकेदारीचे कमिशन
६] सरपणासाठी

१४] तुम्ही किती वर्षापासून त्या भागात कामाला जात आहात?

१५] तेथील कामाचा कालावधी पासून पर्यन्त

१६] तुम्ही तिकडे गेल्यानंतर राहण्याची व जेवणाची तुमची व तुमच्या सोबत असलेल्या व्यक्तींची/जनावरांची कशी व्यवस्था करता?

१७] सर्व खर्च वजा जाता परततांना किती पैसे शिल्लक राहीलेत?

१८] तुमचे या गावात मजूरीचे काम किती महिने मिळते? व त्यावेळच्या मजूरीचे दर किती?

१९] तुम्हाला कोणत्या महिन्यात काम मिळत नाही?

२०] काम बाराही महिने मिळत
असल्यास स्थलांतराची कारणे?

२१] तुम्हाला रोजगार हमी योजनेची/
इतर शासनाची/ग्रामपंचायतीची कामे
मिळतात का?

२२] तुम्हाला कोणती कामे कमिळतात?

२३] तुम्ही त्या कामावर का जात नाहीत

२४] सध्या गावातील मजुरीचे दर काय?
किती तासासाठी?
अ] शेतीची कामे
ब] ग्रामपंचायत कामे
क] रोजगार हमीची कामे
ड] इतर

२५] आपल्या भागांत कोणती कामे सुरू
केली म्हणजे तुम्हाला परप्रांतात
जाण्याची जरूरी भासणार नाही.